ISSN 2349-638x
Impact Factor 6.293

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No. 65

Executive Editor
Dr. S.M. Maner
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Prof.G.V.Baviskar
Head, Dept. of History
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Dr. B.V.Gund
Head, Dept. of Pol.Sci.
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Prof. B.J.Kukde
Head, Dept. of Sociology
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Chief Editor
Prof. Pramod Tandale

| Sr No | Author Name | Title of Article | Page No. |
|---|---|---|---|
| 84 | इब्राहीम जमन तडवी | डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या वैचारिक धोरणातील आरक्षण | 242 |
| 85 | डॉ. मारोती घंटेवाड | भारताच्या परराष्ट्र धोरणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका | 244 |
| 86 | प्रा डॉ. गजाजन हनवते | स्त्री - पुरुष तुलना एक वास्तविक अभास विशेष संदर्भ - राजकरण | 248 |
| 87 | डॉ. निलेश गोकूळ शेरे | नक्षलवादी चळवळ आणि मानवी हक्क | 251 |
| 88 | दिनकर सुदामराव रासवे | महिलांचा राजकारणातील सहभाग | 253 |
| 89 | प्रा. ए. एन. भोसले | महिलांचा राजकरणातील सहभाग | 255 |
| 90 | Dr. Deepak Singh<br>Mr. Ravindra Vyankatrao Mugale | Sardar Vallabhbhai Patel : A Real Actor In India's Freedom Movement | 257 |
| 91 | Shri. D.R. Nikalje | Global History as a Trend of Global Studies | 261 |
| 92 | प्रा.डॉ.फुलचंद सुर्यभान दुधभाते | इतिहासाचे पुनर्लेखन | 264 |
| 93 | प्रा. संतोष सोमनाथ कपाळे | वंचितांचा इतिहास लेखन प्रवाह एक चिंतन | 266 |
| 94 | प्रा. निल नागभिडे | भारतीय समाजसुधारणा चळवण व राष्ट्रवाद | 269 |
| 95 | प्रा.डॉ. आर. बी. गव्हाणे | स्थानिक इतिहास लेखनाचे महत्व | 271 |
| 96 | प्रा.सिध्देश्वर चंद्रकांत सुरवसे | स्थानिक इतिहास लेखनातील महत्वपुर्ण घटक व महत्व एक चिकित्सक अध्ययन | 274 |
| 97 | Shri. G.V. Baviskar | Subaltern Studies : A New Trend in Writing History | 277 |
| 98 | प्रा.धनेश मधुकर हरड | इतिहास संशोधनातील नवीन प्रवाह –स्थानिक इतिहास – एक दृष्टक्षेप | 283 |
| 99 | प्रा. डॉ. उद्धव उमाजी राऊत | रामपूरचे मूर्तिशिल्प | 286 |
| 100 | श्री.अनिल महादेव बोराडे | स्थानिक इतिहास एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप | 288 |
| 101 | डॉ अब्दुल समद बादशाह शेख | अहमदनगर जिल्ह्यातील गोगल गावचा इतिहास | 292 |
| 102 | डॉ. वनिता साबळे-चव्हाण | औरंगाबाद जिल्ह्याचा प्राचीन राजकीय वारसा | 294 |
| 103 | प्रा. संदिप भैरू जाधव | जागतिक महामंदीच्या काळातील महाराष्ट्रातील सहकार चळवळ : एक ऐतिहासिक अभ्यास | 296 |
| 104 | प्रा.डॉ.नानासाहेब पंडितराव मनाळे | ढोकी गावाचा स्थानिक इतिहास | 301 |

# स्थानिक इतिहास लेखनाचे महत्व

**प्रा.डॉ. आर. बी. गव्हाणे**
( इतिहास विभाग प्रमुख)
श्री.शरदचंद्रजी पवार महाविद्यालय नारंगवाडी,
ता. उमरगा जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना:-**

इतिहास लेखन ही अखंडपणे चालणारी प्रक्रिया असुन अधुनिक काळात इतिहास लेखनाचे नव नवे लेखन प्रवाह रूढ झाले आहेत. सर्वसाधारणपणे इतिहास म्हणजे,''भूतकालीन मनोरंजक व संस्मरणीय घटनांचा शोध होय.'','थोर व्यक्तीची चरित्रे व त्यांनी बजावलेली कामगिरी म्हणजे इतिहास होय.'',''इतिहास म्हणजे वर्तमान काळ व भूतकाळ यामधील कधीही न संपनारा संवाद होय'' इत्यादी व्याख्येवरून इतिहासाचा अर्थ समजतो.

जगामध्ये प्राचीन काळापासून इतिहास लेखनाची ही परंपरा अस्तित्वात असल्याचे दिसून येते. इ.स. पूर्व 6 व्या शतकात ग्रीक देशामध्ये इतिहास लेखनाला सुरूवात झालीतर युरोपमध्ये इ.स. तिस-या शतकात इतिहास लेखनाला प्रारंभ झाला. 15 व्या शतकापर्यंत या इतिहास लेखनात प्रामुख्याने धर्माचा प्रभाव जास्त असल्याचे दिसून येते. पण पुढे जाऊन अलिकडच्या काळामध्ये इतिहास लेखनामध्ये अनेक विचार प्रवाह आले.

19 व्या व 20 व्या शतकात जगातील अनेक प्राचीन संस्कृतींचा शोध लागला आहे. त्या संस्कृतींचा अनेक बहूविध अंगानी अभ्यास केला गेला. त्यामूळे इतिकासाच्या कक्षा अधिक रूदावल्या गेल्या. प्राचीन व मध्ययुगीन काळातील इतिहासाची व्याप्ती ही प्रामुख्याने राजकीय इतिहासापुरतीच मर्यादित होती. आधुनिक काळात मात्र इतिहासाची व्याप्ती खूपच व्यापक बनली आहे. राजकीय इतिहासाबरोबरच आज सामाजिक, आर्थीक,धार्मीक, सांस्कृतीक, प्रादेशीक व स्थानिक इतिहास अभ्यासला जात आहे. त्यामूळे इतिहासाचे स्वरूप व व्याप्तीत वाढ झाल्याने इतिहासाच्या कक्षा रूदावल्या आहेत.

इतिहास लेखनामध्ये समाज, व्यक्ती, स्थळ व काल हे घटक महत्वाचे असले तरी 'स्थल' या घटकाला विशेष महत्व आहे. स्थलावरून घडलेली घटना व घटनेचे विशिष्ट महत्व लक्षात येते. इतिहास लेखनामध्ये गावाचा, तालुक्याचा व जिल्हाचा इतिहास लिहिल्यास आपोआपच प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहासामध्ये मोलाची भर पडते. स्थानिक इतिहासाशिवाय राष्ट्रीय इतिहासाला पूर्णत्व येत नाही म्हणूनच स्थानिक इतिहासाचे महत्व इतिहास लेखनात अनन्यसाधारण असे आहे.

**1) शोध निबंधाची उद्दिष्टे:-**

1) स्थानिक इतिहासातून राष्ट्राचा इतिहास अभ्यासने.
2) स्थानिक इतिहासाचे स्वरूप अभ्यासने.
3) स्थानिक इतिहास लेखनातून तेथील धार्मिक, भौतिक, सामाजिक, राजकीय सांस्कृतीचा अभ्यास करणे.
4) स्थानिक इतिहासातील घटनांचा शोध घेणे किंवा तेथील समस्यांचा शोध घेणे.
5) स्थानिक इतिहासाचे देशाच्या इतिहासातील महत्व विशद करणे.

**2) शोध निबंधाची गृहितके:-**

1)एखादया गावाचा किंवा शहराचा ठिकाणची ऐतिहासीक माहिती घेणे.
2) स्थानिक इतिहासाचे स्वरूप हे, राजकीय, आर्थीक, धार्मिक,सामाजिक, भौगोलिक व सांस्कृतीक अशा प्रकारचे असते.
3) स्थानिक इतिहास लेखनात साधनांची कमतरता जानवते. पूर्णपणे साधने उललब्धूहोतीलच असे सांगता येत नाहीत.
4) स्थानिक इतिहास लेखनात क्षेत्र मर्यादा पडतात.
5) इतिहास लेखनामध्ये आजही अनेक ठिकाणचा स्थानिक इतिहास लिहिला गेला नाही.
6) स्थानिक इतिहासाच्या पायावरच राष्ट्रीय इतिहास आधारलेला आहे.

**3) स्थानिक इतिहासाचा अर्थ व स्वरूप :-**

प्रत्येक गावाला किंवा शहराला आणि त्याच्या नावालाही ऐतिहासिक वारसा असतो. स्थानिक इतिहास लेखनात समाज रचना, चालीरीती, वास्तू, मंदीरे, सन-उत्सव, शिक्षण, संस्कृती इत्यादी सर्व बाबींची नोंद घेतली जाते.

अर्थ:- 1) एखादया गावाचा किंवा शहराचा इतिहास लिहीने म्हणजे स्थानिक इतिहास लेखन होय.
2) स्थानिक इतिहास लेखन म्हणजे एखादया विशिष्ठ स्थानाला केंद्रबिंदू मानून गावचा किंवा शहराचा इतिहास लिहीने होय.

स्थानिक इतिहास लेखनासाठी गाव हे ऐतिहासीक दृष्ट्या महत्वाचा घटक आहे. गाव, कसबा, परगना, तालूका, जिल्हा, प्रादेशिक किंवा विभागीय आणि राष्ट्रीय इतिहास लेखनामध्ये गावातील स्थानिक माहितीला अनन्यसाधारण महत्व आहे. याच्या आधारावर प्रदेशाचा व राष्ट्राचा इतिहास लिहीला जाऊ शकतो.

स्थानिक इतिहासामध्ये निवडलेल्या ठिकाणाचा इतिहास लिहीण्यासाठी तेथील भौगोलिक माहिती प्रमाणेच सांस्कृतीक, सामाजिक, भौतिक , घटकही महत्वाचे असतात. स्थानिक इतिहास लेखनामुळे राष्ट्राचा इतिहास समजने सोपे जाते. तेथील सामाजिक, धार्मीक, सांस्कृतीक, राजकीय, आर्थीक बाबींची वस्तुनिष्ठ माहिती मिळण्यास मदत होते.

**4) विषय प्रतिपादन :-**

Local History ही संकल्पना पाश्च्यात्य देशात उदयास आली व तिथेच प्रगत झाली.पुढे तिला मान्यता मिळाली पण ही संकल्पना जेव्हा आपल्याकडे आली त्योवळी ती 'स्थानिक इतिहास' या मराठी नावाने रूढ झाली. ''स्थानिकइतिहास लेखनामध्ये ज्या स्थानाची किंवा गावाची निवड केलेली असते त्यामध्ये भौगोलिक घटक हा महत्वाचा असतो. भौगोलिकते बरोबरच तिथे वास्तव्यास असलेल्या लोकांची मानसिकता व सांस्कृतीक स्थिती सुद्धा महत्वाची असते. आपल्या गावच्या इतिहासाबद्दल प्रत्येकालाआनंद असतो. पण काही दु:ख दायक गोष्टी सुद्धाअसतात. या दोन्ही स्मृतीबद्दल कातरता येत असते. ही स्मृती कातरता प्रभावी शैलीत पकडण्यात इतिहातकाराचे यश अवलंबून असते''

स्थानिक इतिहास लेखन करतेवेळी गावातील वास्तू महत्वाच्या ठरतात वास्तूंनी त्यांच्या काळाचे प्रतिनिधीत्व केलेले असते. एखादी ऐतिहासीक इमारात किंवा वास्तू, मंदीर इत्यादीचा अभ्यास करणे किंवा इतिहास लिहीणे हा स्थानिक इतिहासाचा भाग आहे. पण देशामध्ये आजही स्थानिक इतिहास लिहीला जात नाही. अनेक स्थानिक ऐतिहासीक ठिकानांची माहीती जगासमोर किंवा राष्ट्रीय इतिहासत येत नाही ही मोठी खंत आहे. उदाहरण द्यायचे असेल तर उस्मानाबाद जिल्हातील उमरगा तालूक्याच्या ठिकाणा पासून उमरगा ते लातूर मार्गावर नारंगवाडी हे गाव वसलेले असूनया गावाला ऐतिहासीक वारसा आहे या गावात अति प्राचीन हेमाडपंथी प्रकारचे महादेवाचे मंदीर आहे. या मंदीरावर दोन शिलालेख कोरलेले आहेत. तसेच त्या मंदीराच्या पाठी मागे एक बारव आहे. त्या बारवच्या दगडावर रतनजी जमसेटजी व त्या नावाखाली 1336 इ. सन असा मजकूर कोरलेला आहे. व त्याच्या खाली दुसऱ्या दगडावर 'साहेबजाय गीरीदार नारंगवाडी' असा उल्लेख कोरलेला आहे. या दोन्ही वास्तू आजही मजबूत स्थितीत आहेत. तेथील मंदीरावरील शिलालेखांचे वाचन झाल्यास नक्कीच तेथील स्थानिक इतिहास उलगडेल व तेथील धार्मीक, सांस्कृतीक, राजकीय, आर्थीक बाबींची माहीती मिळण्यास मदत होईल. या वरून स्थानिक इतिहासाचे महत्व राष्ट्रीय इतिहास लेखनात किती गरजेचे आहे हे लक्षात येते.

**5) स्थानिक इतिहासाचे महत्व :-**

स्थानिक इतिहासाला प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणतात. गेल्या 50 ते 60 वर्षामध्ये स्थानिक इतिहास ही पाश्च्यात्य देशात रूढ झालेली इतिहासाच्या क्षेत्रातील एक सर्वमान्य संकल्पना आहे. आपल्या भारतामध्येही मागील 25 ते 30 वर्षापासून स्थानिक इतिहासाकडे आणि इतिहासाच्या पूणर्मांडणीकडे लेखक संशोधकांचा ओढा वाढल्याचे दिसून येत आहे. स्थानिक इतिहासावर संशोधन करून लेखन केल्यानंतर अभ्यासकांना व संशोधकांना आपले संशोधन सादर करण्याची उत्तम संधी परिषदामधून तसेच मराठवाडा इतिहास परिषद या सारख्या परिषदामधून मिळते.

स्थानिक इतिहास हा प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहासाच्या प्रवासातील मैलाचा दगड ठरतो. स्थानिक इतिहासाशिवाय प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहासाला पूर्णत्व येऊच शकत नाही. '' प्रसिध्द इतिहासकार रेनियर म्हणतो की, ''स्थानिक इतिहास हा अशा पध्दतीने लिहीला पाहीजे की,तो देशाच्या इतिहासामध्ये चपखल बसला पाहीजे.'' शेवटी स्थानिक इतिहास हा प्रादेशिक वा राष्ट्रीय इतिहाचा एक भाग असतो. स्थानिक इतिहासाच्या साहाय्याने सर्वांगीन राष्ट्रीय इतिहास लिहीला जाऊ शकतोम्हणून राष्ट्रीय इतिहासामध्ये स्थानिक इतिहासाचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे.

स्थानिक इतिहासामुळे इतिहासाशी संबंधित घटनास्थळे व व्यक्ती यांच्याबद्दल एक आत्मियता प्रस्थापीत होते. प्रत्येकाला आपल्या गावच्या परिसराच्या इतिहासाबद्दल एक वेगळेच कुतूहल असते. स्थानिक इतिहासाच्या एखादया महत्वाच्या संशोधनामधून राष्ट्राच्या इतिहासावर त्याचा परिणाम दिसून येतो. या स्थानिक इतिहास लेखनामुळेच इतिहासाची व्याप्ती व स्वरूपात बदल होऊन इतिहासाच्या सर्वांगीन बाबीवर अभ्यास होऊ लागल्याने इतिहासाच्या कक्षा रूंदावत चालल्या आहेत. म्हणून स्थानिक इतिहास लेखन परंपरेला इतिहास लेखनामध्ये महत्वाचे स्थान आहे.

**6) सारांश :-**

इतिहास संशोधन आणि लेखन ही सातत्याने चालू राहणारी प्रक्रिया आहे. प्राचीन काळापासून इतिहास लेखनाची ही परंपरा अखंडीतपणे चालू आहे स्थानिक इतिहास लेखन प्रवाह जरी परदेशात उदयास आला असला तरी आज भारतामध्ये या प्रवाहाला अनुसरून स्थानिक इतिहास लेखन मोठया प्रमाणात होताना दिसत आहे.

स्थानिक पातळी वरील इतिहास लेखनामुळे राष्ट्रीय इतिहास लिहीण्यास मदत होते. स्थानिक इतिहास लेखना शिवाय राष्ट्रीय इतिहास परिपूर्ण होऊच शकत नाही. स्थानिक इतिहासाच्या अभ्यासातून आपली संस्कृती परंपरा व आपल्या पुर्वजांचा इतिहास समजण्यास मदत होते. आपल्याला जगाचा इतिहास माहीत असतो. पण आपल्या परिसरातील अनेक महत्वाच्या घटना किंवा स्थानिक ऐतिहासीक स्थळे यापासून अनभिज्ञ असतो. ही माहिती मिळविण्यासाठी स्थानिक इतिहास लेखन अत्यंत महत्वाचे आहे.

स्थानिक इतिहास लेखनामध्ये ज्या गावांचा स्थानिक इतिहास नोंदवला नाही अशा गावांचा अभ्यासाद्वारे संशोधन करून लेखन केल्यास तत्कालीन सामाजिक, सांस्कृतीक,धार्मीक,राजकीय, भौतिकव आर्थिक बाबींची माहीती मिळण्यास मदत होईल व या लेखनातून आपला प्राचीन वारसा पुढील पिढयांना स्फुर्ती व प्रेरणा देणारा ठरेल.

**संदर्भ :-**


1) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक्स पब्लीकेशन,औरंगाबाद, 2015.
2) प्रभाकर देव, इतिहासशास्त्र संशोधन अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेन टॉनिक प्रकाशन, नांदेड, 2007.
3) डॉ. एस.एस. गाढाळ, इतिहास लेखनशास्त्र, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद, 2011.
4) शांता कौठेकर, इतिहासतंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2011.
5) आर. एस. मोरवंचीकर, इतिहास लेखनशास्त्र व इतिहासकार, विद्या बुक्स पब्लीकेशन, औरंगाबाद, 1919.

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - II,
April - June - 2020
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - II APRIL - JUNE - 2020

MARATHI PART - I

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

osm - ③.

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | पर्यावरण व समाज : एक अभ्यास<br>**प्रा. कोटरंगे दत्ता नामदेव** | ६४-६७ |
| १५ | पर्यावरण प्रदूषण आणि मानव अधिकार<br>**प्रा. डी. आर. चव्हाण** | ६८-७२ |
| १६ | नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण व पर्यावरण प्रदूषण : एक अभ्यास<br>**डॉ. महेश मंगनाळे** | ७३-७५ |
| १७ | जलप्रदूषण - एक सामाजिक समस्या<br>**प्रा. तेलंगे नागनाथ निवृत्ती** | ७६-७७ |
| १८ | जागतिक तापमान व त्याचे दुष्परिणाम : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. पार्वती विनायक माने** | ७८-८२ |
| १९ | पर्यावरण प्रदूषणाचा ग्रामीण भागाच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर होणारा परिणाम : एक अभ्यास<br>**डॉ. प्रदीप पंडितराव लग्गड** | ८३-८७ |
| २० | प्रदूषण<br>**प्रा. डॉ. आचार्य आर. डी** | ८८-९० |
| २१ | जलप्रदूषण : एक जागतिक समस्या<br>**प्रा. आर. यु. चोचंडे** | ९१-९३ |
| २२ | जलप्रदूषण व पर्यावरण अवनती<br>**प्रा. गव्हाणे रमाकांत बबनराव** | ९४-९८ |
| २३ | पर्यावरणीय समस्यांवर आधारित साहित्याचे अध्ययन<br>**डॉ. रामहरी मधूकर सुर्यवंशी** | ९९-१०१ |
| २४ | जैवविविधतेच्या ऱ्हासाची कारणे व परिणाम<br>**प्रा. डॉ. रमाकांत ज्ञानोबा वानखेडे** | १०२-१०५ |
| २५ | मराठी साहित्यातून घडणारे पर्यावरणाचे दर्शन<br>**डॉ. विनायक तुकाराम टाळकुटे** | १०६-१११ |
| २६ | आपत्ती व्यवस्थापन आणि भारत : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. विनोद धोंडीराम आचार्य** | ११२-११५ |

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २२. जलप्रदूषण व पर्यावरण अवनती

प्रा. गव्हाणे रमाकांत बबनराव
इतिहास विभाग प्रमुख, श्री शरदचंद्रजी पवार वरिष्ठ महाविद्यालय, नारंगवाडी, तालुका. उमरगा, जिल्हा. उस्मानाबाद.

**गोषवारा**

पर्यावरणाचे संवर्धन करणे ही आज गरज बनली आहे मुख्यत: जलप्रदूषणामुळे मोठ्या प्रमाणावर आजार वाढले आहेत. आज औद्योगिकरण हे वाढले आहे. त्याचा परिणाम कारखान्यातील दूषित पाणी नदीपात्रामध्ये सोडून दिले जाते. त्यामुळे त्याचा परिणाम सजीवावर होतो तसचे शेतीसाठी सुध्दा कीटकनाशके व जंतूनाशके याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. त्यामुळे कॅन्सरसारखे आजार वाढले आहेत. वाढते शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या याचा परिणाम जल प्रदूषण होत आहे. या प्रदूषणाच्या माध्यमातून अनेक आजार वाढता आहेत. साधरणत: ८० टक्के आजार हे पाण्याच्या माध्यमातूनच होत असतात. त्यामुळे हे प्रदूषण रोखणे आज काळाची गरज बनली आहे. त्यासाठी पर्यावरण शिक्षणाची गरज आहे.

**महत्वाचे शब्द-** प्रदूषण, पर्यावरण, अवनती, जलप्रदूषण, उपाय.

**प्रस्तावना**

ऱ्जारो वर्षाचा सांस्कृतिक इतिहास असलेली आजची भारतीय समाजव्यवस्था अनेक स्थित्यंतरातून घडलेली आहे. श्रध्दा आणि अंधश्रध्दा यांच्या खत पाण्यात समाजजीवनाची पाळेमुळे प्राचीन काळापासून खोलवर रूजलेली आहेत पर्यावरण ही निसर्गाने दिलेली एक देणगी आहे आधुनिक विज्ञान आणि व्यवस्थापनाने या समजाव्यवस्थेत झपाट्याने बदल घडून येत असला तरी पर्यावरणाचा ऱ्हास हा त्याचा एक दृश्य परिणाम आहे. दुर्बल घटकांच्या विकासाठी भोवतालच्या साधनसामग्रीवर आणि वापरावर त्यांचा ताबा असणे आवश्यक आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे त्यांचा जगण्यासाठी चाललेला लढा दिवसेंदिवस अधिक अवघड होत आहे. सध्याचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग असल्याने जगातील प्रत्येक देशाने औद्योगिकरणाची कास धरली असल्याचे दिूसन येते. औद्योगिकरणामुळे प्रमाणावर उद्योगधंदे, कारखाने उभे राहिले आहेत. औद्योगिकरणामुळे संपूर्ण जगाचे आर्थिक चित्र पूर्णपणे बदलण्याचे व आपल्या देशाचा झपाटयाने आर्थिक विकास व्हावा यासाठी प्रत्येक देश प्रयत्नशील आहे. त्याला आपला भारत देश ही अपवाद नाही. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतात मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे व कारखाने उभे राहिले. त्यामुळे भारताचा आर्थिक विकास घडून येण्यास मदत झाली. पण दुसऱ्या बाजूला मात्र पर्यावरणाचा ऱ्हास व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणावर घडून आल्याचे दिसून येते.

जगातील पर्यावरणाच्या होणाऱ्या पदूषणाला औद्योगिकरण हे मोठया प्रमाणावर जबाबदार असल्याचे दिसून येते. कारखान्यातील दूषित पाणी हे नदीत सोडले जात असल्याने जलप्रदुषण मोठ्या प्रमाणात घडून येत असल्याने त्याचा परिणाम पर्यावरणावर होत आहे. जलप्रदूषणामुळे पाणी प्रश्न गंभीर होत चालला आहे. जलप्रदूषण होण्यास हे एकच कारण कारणीभूत नसून त्याला अनेक कारणे कारणीभूत आहत. जलप्रदूषणामुळे पर्यावरणातील संतुलन बिघडते आहे.

**संशोधनाचे उद्देश**

१. पर्यावरणातील साधनसामग्रीचा उपयोग ( उदा. पाणी सद्सदविवेक बुध्दीने करणे.
२. जलप्रदूषण समस्याचे निराकरण करणे व पर्यावरण संतुलन राखणे
३. जलप्रदूषण समस्याची माहिती इतरांना करून देणे
४. जलप्रदूषणाचे दुष्परिणाम पर्यावरणावर कसे होतात याची माहिती जाणून घेणे व इतरांना देणे
५. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी जलशुध्दीकरणाचे महत्तव पटवून देणे

**संशोधनाची गृहितके**

१. आधुनिक तंत्रज्ञानाच्या बळावर नैसर्गिक साधन संपत्तीचे अमर्याद शोषण होत आहे.
२. मानवनिर्मित उद्योग धंद्यातून व कारखान्यातून अनेक विषारी द्रव्य बाहेर पडून जल प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे.
३. जलप्रदूषामुळे पर्यावरणाची अवनती होत आहे.
४. मानवाने स्वतःच्या सुख सोयीसाठी निसर्गातील अनेक साधन संपत्तीचा नाश केला आहे किंवा ती साधनसंपत्ती दूषित केल्याने त्याचे दुष्परिणाम पर्यावरण होत आहेत.

**संशोधनाचे पध्दती**

प्रस्तुत संशोधन विषयात द्वितीय तथ्य संकलन साधनांचा वापर करण्यात आला असून संशोधनाच्या ऐतिहासिक, विश्लेषणात्मक तसेच वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**विषयप्रतिपादन**

जल म्हणजे पाणी, अर्थात जीवन ज्याला शिवाय जीवन कल्पनाच करवत नाही. मानवी जीवन आणि जल या दोन बाबी भिन्न होऊच शकत नाहीत. पाण्याशिवाय जीवांचे अस्तित्वच राहू शकत नाही. पाणी ह पर्यावरणातील सजीवांना आवश्यसक असणाऱ्या मूलभूत घटक आहे. "पृथ्वीवर पाणी मुबलक असले तरी उपलब्ध पाण्याचे वितरण फारीच विषम असून पाण्याचा नियोजित व संवर्धित वापर ही काळाची गरज झाली आहे. पृथ्वीवरील ७१ टक्के भाग पाण्याने व्यापला आहे व २९ टक्के भाग जमिनीने व्यापला आहे. एकूण पाण्यापैकी ९७ टक्के पाणी समुद्रातल्या क्षार जलात व २.१ टक्के पाणी हिमाच्या स्वरूपात बंदिस्त आहे. तर केवळ झिरो पॉईंट नऊ टक्के पाणी गोड्या पाण्याच्या स्वरूपात आहे."[१] हवे प्रमाणेच नद्या, नाले, सरोवर, समुद्र, तलाव या विविध जलसाठा मध्ये प्रदूषकांचा प्रवेश होत असल्याने जलप्रदूषणाची समस्या कठीण होत आहे.

कृषी, उद्योग, वाहतूक, बांधकाम, पशुजिवन, वनस्पती व मानवासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. पण औद्यायोगिकीकरण व नागरीकरणामुळे जलसंपदा धोक्यात आली आहे. मोठमोठ्या नद्या, सरोवरे, सागर, महासागर, एवढेच काय भूजल देखील प्रदूषणमुक्त राहिले नाही. माणसाच्या शरीराला रोज ५ लिटर पाण्याची आवश्यकता असते. रोज ४० लिटर पाणी प्रत्येकाला विविध कारणासाठी वापरावी लागते. गेल्या तीस वर्षात पाण्याचा जागतिक वापर तिप्पट वाढला आहे. मानवाने पाण्याचा अनिर्बंध व अयोग्य वापर केल्याने जलप्रदूषाची समस्या निर्माण झाली आहे.

**अर्थ व स्वरूप**

"पाण्यात प्रविष्ट होणाऱ्या किंवा निर्माण झालेल्या घातक प्रदूषक आमच्या अस्तित्वास जल प्रदूषण म्हणतात."

१. "पाण्याचा प्राकृतिक, रासायनिक, जीवशास्त्रीय गुणधर्मात बदल झाल्यामुळे ते पाणी सजीवांना व मानवाला अपायकारक ठरते त्याला जलप्रदूषण म्हणतात."

२. डब्ल्यू. एच. ओ. "नैसर्गिक किंवा इतर बाह्य पदार्थांच्या मिश्रणाने पाणी अस्वच्छ, विषारी व घाण होते. पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण घटते व त्या पाण्यामुळे सजीवांना आरोग्य बिघडते त्यास जलपद्रूषण म्हणतात."[२]

३. P. vivier, "खराब झालेल्या पाण्यामुळे अन्न विषारी बनते. मानव, प्राणी, शेती, मासेमारी, कारखानदारी यांच्या वर त्या पाण्याचा दुष्परिणाम होतो. त्यापासून सजीवांचे आरोग्य बिघडते त्यास जलप्रदूषण म्हणातात.

पाण्याचे दूषितीकरन हे नैसर्गिक घटकापेक्षा मानवी घटकांमूळे जास्त प्रमाणात होते. नैसर्गिक घटकांमध्ये जमिनीची धूप होते व खडकातील विषारी रासायनिक पदार्थ पाण्यात मिसळून पाणी गढूळ होते. लाव्हा रसाच्या उद्रेकातून बाहेर पडलेले रासायनिक विषारी पदार्थ, वनस्पती, प्राणी, कीटक यांचे कुजुन विघटन होऊन तयार झालेले पदार्थ पाण्यात मिसळतात व पाणी अस्वच्छ होते. अशा पध्दतीने नैसर्गिक जलप्रदूषण घडून येते.

**जलप्रदूषणाची कारणे व परिणाम**

**१. शहरातील किंवा वस्तीतील घाण, केरकचरा, मैला, सांडपाणी हे जलाशयात सोडल्याने जल प्रदूषित होते**

दूषित पाण्यावर डास, माशा, विषारी, कीटक वाढतात व ते रोगांचा फैलाव करतात. हिवताप, मलेरिया, त्वच रोगइत्यादी आजार निर्माण होतात. वसाहतीतील गटारांची घाण, मैला, मलमूत्र पाण्यात सोडल्याने नदीचे पाणी दूषित होते व ते सजीवांना अपायकारक ठरते." दिल्लीत यमुना नदीचे पाणी कारखान्यातील व शहरातील गटारीच्या घाण पाण्यामुळे इतके प्रदूषित झाले की, १९९५ मध्ये तेथे काविळीची साथ पसरली व अनेक लोक मृत्युमुखी पडले."[३] यावरून आपणास दूषित किती अपायकारक असते हे लक्षात येते.

**२. कारखानदारीतील रासायनिक विषारी पदार्थ पाण्यात मिसळल्याने जलप्रदूषण होते**

कारखान्यांमध्ये पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. या कारखान्यातून बाहेर सोडलेले घाण कमी कारखान्याच्या परिसरात दुर्गंधी निर्माण करते. ते दूषित पाणी अनेक ठिकाणी नदी, नाले, व समुद्रात सोडले जाते कारखान्यातील प्रदूषणमध्ये तेल, वायू प्लास्टिक, धातूंचे कण, आम्ले, डी.डी.टी. इत्यादींचा समावेश होतो.

"कारखान्यातून अनेक प्रकारची उपद्रव्य, घन, द्रव्य व वायू स्वरूपात पाण्यात मिसळून जलप्रवाह सोडली जातात. त्यामुळे अशा पाण्याची क्षारता वाढून ऑक्सिनचे प्रमाण कमी होते. त्यातून जल परिसंस्था ढासळते. शुध्द पाणी प्रदूषित झाल्याने त्याचे विपरीत परिणाम पर्यावरणावर देखील होतात. उदा. कर्नाटक राज्यातील धारवाड जिल्हयात हरिहर शहरात वाली फायबर फॅक्टरी मुळे नदी प्रदूषित झाली आहे. त्याचप्रमाण रूपकेला (ओरिसा) येथील लोह पोलाद उद्योग यामुळे तेथील नाले प्रदूषित झालेले दिसतात."[४]

मुंबईच्या सांडपाण्यामुळे माहीमची खाडी डासांचे कोठार बनली आहे. कारखानदारीतून बाहेर पडणारे शिशाचे सूक्ष्मकण हवेतून पाणी व मातीत मिसळतात. शीशे हे मानवासह वनस्पती व प्राण्यांना सुध्दा हा अत्यंत हानीकारक असते.

त्यामुळे लिव्हर व किडनीचे आजार होतात. तसेच पारा (मिथेल मर्क्युरी) हा प्रदूषक ही प्राणघातक असतो.'' १९५३ ते १९६१ या काळात जपानमधील क्युशू बेटावरील मिनामाता आजार हा पाऱ्याच्या जलप्रदूषणातून निर्माण झाला. पाण्यातील मासळीच्या आहारातून पारा हा शरीरात प्रवेशतो. यात झोप न येणे, अंग सुजणे व मृत्यू येणे हे या प्रदूषकांमुळे घडते.''[५]

विकसित व विकसनशील देशातील औद्योगिक विभागातून वातावरणात कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड, धूलिकण, धूर, शिशे यासारखी अनेक प्रदूषके बाहेर टाकली जातात. या प्रदूषकांची वातावरणातून येणाऱ्या पावसाबरोबर प्रक्रिया होऊन त्याची विविध आम्ले तयार होतात व आम्लवर्षा होते. त्यामुळे त्याचा पर्यावरणावर देखील विपरीत परिणाम होतो. आम्लयुक्त पाणी जलाशयात पोहोचते व ते पाणी प्रदूषित होते. १९७९ मध्ये युरोप व १९८२ मध्ये स्वीडनमध्ये आम्लवर्षा झाली होती.

**३. शेतीसाठी जंतूनाशके, कीटकनाशके व औषध फवारणी मुळे जलप्रदूषण घडून येते**

वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज भागवण्यासाठी दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी सुधारित वियाणे, अतिउच्च प्रतीची कीटकनाशके व जंतूनाशके यांचा वापर अधिक प्रमाणात केला जात आहे. ही औषधी पिकांवर, वनस्पतीवर फवारल्यावर पावसाच्या पाण्याबरोबर ओढे, नाले, नद्या व तलावात मिसळतात व अन्नसाखळीतून आहारातून शरीरात प्रवेश करतात. हे दूषित पाणी पशू, पक्षांनी पिल्याने अनेक सजीव मरतात त्यामुळे त्यांचे पर्यावरणावर देखील दुष्परिणाम घडून येतात.

**४. प्लास्टिक व केरकचरा जलाशयात टाकल्यामुळे जलप्रदूषण होते**

प्लास्टिक, कचरा हा पाण्यामध्ये टाकला जातो. कचरा मधील सेंद्रिय पदार्थांचे विघटन होते पण प्लास्टिक, काचा यासारख्या पदार्थांचे विघटन होऊ शकत नाही. एक्स व्हिडीओ वर्षानुवर्षे हे पदार्थ त्याच स्थितीत राहतात त्यामूळे अनेक ठिकाणी समुद्र पृष्ठावर प्लासिटकच्या वस्तूंचा कचरा तरंगत असतो व त्यामुळे समुद्रातील पाण्याच्या बाष्पिभवनाचवा अडथळे निर्माण होतात आणि पर्जन्यामध्ये घट होते. त्यामुळे त्याचा परिणाम पर्यावरणावर पडतो.

**५. खनिज तेलवाहू जहाजावरील चढ- उतार करताना दरवर्षी सुमारे एक लक्ष टन खनिज तेल समुद्रात पडते.**

त्यामुळे मासे व जलचर प्राणी मरतात. तेल वाहू दादांना अपघात झाल्यास फार मोठे तेल सागरात मिसळते व तेथील जलप्रदूषित होत.'' सरासरी २८४ दशलक्ष गॅलन खनिज तेलाची टँकरमधून गळती होते. १९६७ मध्ये टेरीकॅन्चन या तेलवाहू नौकेला ब्रिटनच्या किनाऱ्यावर अपघात झाला व १.२ लक्ष टन तेल समुद्रात पसरले. ३०जुलै १९८७ ला बॉम्बेहायमधील कंपनीच्या जहाजाला अपघात झाला. त्यात एक १.१७ लाख टन तेल सागरात मिसळले.''[६] काय याचा किनाऱ्यालगतच्या पर्यावरणावर दुष्परिणाम झाला व सागरातील लाखो प्राणी मृत्यूमूखी पडले.

अशा प्रकारे अशा अनेक कारणामुळे जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात घडून येत आहे. त्यामुळे मानवाला व सजीवांना शुध्द पाणी मिळते कठीण होत चालले आहे. या प्रदूषणाचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात पर्यावरणावर देखील पडत आहेत.

**जलप्रदूषणावरील उपाय**

जलप्रदूषणाची समस्याही स्थानिक, प्रोदशिक व जागतिक स्वरूपाची आहे. पृथ्वी वरील जलपरीसंस्थानाचा नाश जलप्रदूषणामुळे होत आहे. जलप्रदूषणाचे दुष्परिणाम सजीव व वनस्पती यांच्या वर होत असल्यामुळे पर्यावरणातील संतुलन

बिघडत चालले आहे. त्यामुळे जल प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी काही उपाय योजना करणे आवश्यक आहे. त्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. शहरातील किंवा वस्तीतील सांडपाणी, मैला, कचरा नद्यामध्ये सोडू नये. ते प्रक्रिया करून शुध्द करावे व टाकाऊ पदार्थ पासून खत निर्माण करावे
२. प्लास्टिकचा कचरा स्वतंत्र वेगळा जमा करून त्यापासून रस्त्यावर पसरण्याचे डांबर तयार करावे.
३. प्रदूषित पाण्याचे शुध्दीकरण करून व औद्योगिक सांडपाण्यातून विषारी पदार्थ प्रक्रियेद्वारे बाजूला काढून नंतरचे पाण्याचे विसर्जन करावे.
४. जलप्रदूषण नियंत्रणासाठी प्रसारमाध्यमांचा व लोक शिक्षणाचा वापर करावा
५. प्रदूषण नियंत्रण कायद्यांची कडक अंमल बजावणी करावी
६. जास्तीत जास्त आजार हे पाण्यापासून होतात. त्यामुळे पाण्याची स्वच्छता राखणे हे प्रत्येक व्यक्तीचे आद्य कर्तव्य मानले पाहिजे

**समारोप**

मानवाने आधुनिक तंत्रज्ञान व विज्ञानाची कास धरल्यामुळे अनेक क्षेत्रात प्रगती केली. मानवाला त्याचा फायदाही झाल्याचे दिसून येते. पण त्याचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. मानव निर्मित जलप्रदूषणामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले आहे. मानवाने जर या संकटावर तत्पूर्वीच उपाययोजना राबवून जलप्रदूषण नियंत्रणात आणली अनेक रोगांपासून संरक्षण मिळेल. तसेच या समस्यावर मात केल्यास पर्यावरणाचा ऱ्हास देखील थांबेल व पर्यावरण संतुलित राहण्यास मदत होईल.

**संदर्भसूची**

१. प्रा. वा. र. अहिरराव-वराट-पर्यावरण विज्ञान, निराली प्रकाशन, पुणे, १९९३ पृथ्वीवरील.पृ. क्रमांक २४४.
२. डॉ. प्रकाश सावंत-पर्यावरण भूगोल. फडके प्रकाशन, कोल्हापूर. १९९८ पृ. क्रमांक ६२.
३. डॉ. प्रकाश सावंत – पर्यावरण भूगोल. पृ. क्रमांक ६४
४. ज्ञोनश्वरी सूर्यवंशी – पर्यावरणशास्त्र. श्री विद्या प्रकाशन पुणे २००७. पृथ्वीवरील. क्रमांक ८४.
५. डॉ. प्रकाश सावंत – पर्यावरण भूगोल. पृष्ठ क्रमांक ६४
६. उपरोक्त – पृष्ठ क्रमांक ६६.

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

2nd March 2019 Special Issue- 147 (I)

# Agriculture & Water Management in Historical Period in India

**Chief Editor**
**Dr. Dhanraj T. Dhangar**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
**Dr. Kshirsagar O.M.**
**Principal**
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) - 413517

**Co- Editor of This Issue**
**Dr. Shinde A.N.**
HOD, Dept. of History,
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) – 413517

**Assist.Prof. Patil J.J.**
Dept. of History,
Kai. Bapusaheb Patil Ekambekar Mahavidyalaya,
Udgir, Dist. Latur-(M.S) – 413517

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 147 (I) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

# Index

1. Water Literacy Through School Education 6
**Dr. O. M. Kshirsagar , Jagannath B. Darandale**

2. Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj's Agricultural Policies 8
**Dr. Shinde Anant Namdevrao**

3. Ancient Techniques of Water Management 10
**Dr. Rajaram R.Pimpalpalle**

4. Khazana Bawali: The Best Example Of Water Management In Medieval India 17
**Prof. Ravi S. Satbhai**

5. Water Management In The Fort - With Special Reference To Daulatabad 21
**Dr. Gorakhnath P. Phasale**

6. Water Literacy: A perfect solution for Environmental Pollution 25
**Sadhana K. Patil**

7. Water Management During The Tughalak Period 27
**Mr. Pawar Dattatray Vilas** -

8. The Irrigation Policy in Marathwada Under the Last Nizam 29
**Ashwini Subhash Khandekar**

9. Agriculture and Water Management in British Period 32
**Dr. DevidasTumkunte**

10. Geographical Analysis Monthly Rainfall InChakur 35
**B.A. Motherao**

11. Agriculture and Irrigation in Hyderabad-Karnataka Region:A Historical Survey 37
**Dr. DevidasTumkunte, Sangeeta**

12. Water Crisis in Contemporary India 40
**Asst. Prof. More J.G.**

13. Irrigation Projects in Marathwada Region 43
**Dr. Vinkar V.N.**

14. Problems And Solutions Of Agriculture After Independence" 45
**Dr.Prof. Sangita Ghar, Prof. Nitin V Dadge**

15. Water management system in Chalcolithic age 48
**Mr. Bindge S.M. , Prof. Dr. Sawant U.S.**

16. Water Management in India 50
**Asst. Prof. Mrs. Rekha B. Lonikar**

17. Water Management on Fort : Shivaji Maharaj Era 53
**Prof. Vaijinath Chickbase**

18. शिवकालीन जलव्यस्थापन– एक अभ्यास 56
**प्रा. डॉ. मारोती किशनराव जाधव**

19. ब्रिटिश कालीन भारतातील कृषी व जलसिंचन व्यवस्था 58
**प्रा.डॉ.गव्हाणे रमाकांत बबनराव**

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 147 (I) Agriculture & Water Management in Historical Period in India | March 2019 | UGC Approved No. 40705

# ब्रिटिश कालीन भारतातील कृषी व जलसिंचन व्यवस्था

**प्रा.डॉ.गव्हाणे रमाकांत बबनराव**
श्री शरदचंद्रजी पवार महाविद्यालय, नारंगवाडी ता. उमरगा जि. उस्मानाबाद

---

**प्रस्तावना:-**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. शेती हा भारतातील प्रमुख व्यवसाय आहे. प्राचीन काळापासून भारतात शेती हेच उपजिविकेचे महत्वाचे साधन आहे. त्यामुळे शेती आणि इथला शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही 70 ते 72 टक्के लोक शेती आणि शेतीशी निगडीत व्यवसायावरती आपली उपजिविका करतात. 1918 मॉटेग्यू चेम्सफोर्ड रिपोर्टात भारतीय परिस्थीती संबंधी परिच्छेदात म्हटले आहे की, "शेती हा लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. इंग्लंडसारख्या औधोगीक विकास झालेल्या देशात 100 पैकी 58 टक्के लोक उदयोग धंदयात असतात आणि फक्त 8 टक्के लोक शेतावर राहतात पण भारतात 71 टक्के लोक शेतीवर असतात. सर्व भारतात 315 दशलक्ष लोकापैकी 226 दशलक्ष शेतीवर असतात आणि त्यापैकी 208 दशलक्ष प्रत्यक्ष शेती करुन राहतात"[1] म्हणजे भारतात सर्वात जास्त लोक हे शेतीवरच अवलंबुन होते असे दिसते व आजही खूप मोठया प्रमाणावर लोक शेतीवरच आवलंबुन आहेत. परंतू भारतातील शेती ही निसर्गावर अवलंबुन असल्यामुळे बऱ्याच वेळा नैसर्गिक आपत्तीचे सावट शेतकऱ्यावर पडत असते.

"ब्रिटिश सत्ता भारतामध्ये प्रस्थापीत होण्यापुर्वी भारतीय खेडी ही स्वंयपुर्ण होती. साधारणतः खेडे गावात लोकाच्या गरजा पुर्ण होत असत बाजारात विक्रीसाठी वस्तुचे अतिरिक्त उत्पादन करण्यात येत नसे. ब्रिटिशपुर्व अर्थ व्यवस्था ही प्रामुख्याने वस्तुविनिमय पध्दतीवर आधारीत होती. ब्रिटिश राजवटीत तीचे रोखीच्या अर्थव्यवस्थेत रुपांतर झाले."[2] ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया शेतीच होता. 70 टक्के पेक्षा जास्त लोक शेतीवर अवलंबुन असले तरीही शेतीतंत्र विकसित नव्हते आणि शेती व्यवसाय ही पावसाच्या पाण्यावरच अवलंबुन असल्यामुळे शेती व्यवसाय हा अगदीच बेभरवशाचा होता. अशा स्थीतीत ब्रिटिश सत्तेचे आगमन हे शेती व्यवसायावर दुरगामी परीणाम करणारे ठरले ब्रिटिश काळात भारतात काही ठिकाणी जनतेचा असंतोष व सतत पडणाऱ्या दुष्काळावर मात करण्यासाठी नाइलाजास्तव काही ठिकाणी पाणी पुरवठयासाठी काही तुटपुंज्या योजना राबवल्या गेल्या, पण त्याही स्वतःचा स्वार्थ ठेऊनच.

**1. ब्रिटिश कालीन भारतातील कृषी व्यवस्था :-**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राला अनन्य साधारण महत्त्व आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतीवर आकारला जाणारा शेतसारा (जमीन महसुल) हाच सरकारच्या उत्पन्नाचे महत्वाचे साधन होते. भारतीय शेती ही मान्सुनचा जुगार आहे. त्यामुळे निसर्गाच्या लहरीपणावरती शेती क्षेत्र अवलंबुन आहे. कधी अति पर्जन्यमुळे शेतीचे नुकसान होते तर कधी पर्जन्याअभावी कृषी क्षेत्र कोरडेच राहते.त्यामुळे त्याचा परिणाम अन्नधान्य उत्पादन घटण्यावर होतो. साहजिकच महाकाय लोकसंख्येच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो.

ब्रिटिशांची सत्ता भारतात आल्यानंतर शेती आणि शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत वाईट झाली. "भारतावरील कंपणीच्या शासन काळात कृषीबाबत कंपणी सरकारचे धोरण एकाच उद्दिष्टावर केंद्रित झाले होते ते म्हणजे जास्तीत जास्त जमीन महसुल पदरात पाडून घेणे."[3] ब्रिटिश सरकारच्या काळात मोठया प्रमाणात भारतीय शेती व शेतकरी वर्गाची दुरावस्था झाल्याचे दिसून येते. येथील शेतकऱ्याची मोठया प्रमाणात आर्थिक पिळवणूक होऊन तो दारिद्रयात व उपासमारीत जीवन जगत असल्याचे दिसून येते.

भारतीयांची आर्थिक लुट करावी या उद्देशाने प्रेरीत झालेल्या कंपणी सरकारने जास्तीत जास्त महसूल गोळा करण्याच्या उद्देशाने भारतात वेगवेगळया प्रांतात वेगवेगळया महसुल विषयक पध्दतीचा वापर केला. " इंग्रजांना 1765 मध्ये मिळालेल्या बंगालच्या दिवाणी अधिकारानूसार बंगालच्या जमीन महसुलाच्या उत्पन्नाचा अधिकार कपंणीच्या हाती आला."[4] व तेथुनच पुढे भारतात रयतवारी, जमीनदारी, कायमधारा, महालवारी इत्यादी महसुल विषयक पध्दतीचा वापर करुन प्रचंड प्रमाणात महसुल गोळा केला. " रयतवारी पध्दतीची सुरुवात सर्वप्रथम मद्रास इलाख्यात बारामहल जिल्हा प्राप्त झाल्यानंतर 1792 मध्ये ही पध्दती अंमलात आनली"[5] व नंतर पुढे भारतातील इतर भागातही लागू केली.

ब्रिटिश सरकारने भारतीय शेतीचे मोठया प्रमाणात व्यापारीकरण घडवून आणले "ब्रिटिश राजवटीपूर्वी शेतकरी शेतीला उपजिविकेचे साधन मानत असे. शेतकऱ्यामध्ये व्यापारीवृत्ती निर्माण झाली नव्हती स्वतःची व गावची गरज भागविण्याच्या दृष्टीने शेतकरी शेतीतून त्याला योग्य वाटेल ते पीक काढी धान्योत्पदनाबाबत शेतकऱ्याला संपुर्ण स्वातंत्र्य होते. पण ब्रिटिशाची सत्ता स्थापन झाल्यावर व इंग्लंडमध्ये औधोगीक क्रांती घडुन आल्यावर इंग्लंडला आवश्यक असलेली पिके शेतीतून काढण्यास शेतकऱ्याला प्रवृत्त करण्यात आले व भारतीय शेतीत व्यापारी पिके किंवा नगदी पिके घतेली जाऊ लागली"[6] कापुस,ऊस,ताग,शेंगदाना,नीळ,तंबाखू,चहा,कॉफी, रबर इत्यादी नगदी पिके अन्नधान्य उत्पादनाऐवजी घेण्यात येवू लागली.

"व्यापाराचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेऊन शेती करणे, घरच्या वा गावच्या वापरापुरते नव्हे तर बाजार पेठेत शेतमाल विकुन नफा मिळवण्यासाठी शेती मालाचे उत्पादन करणे."[7] यालाच शेतीचे व्यापारीकरण म्हणतात. या शेतीच्या व्यापारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिकच दुर्बल बनली. नगदी पीके घेण्यास शेतकऱ्यावर सक्ती करण्यात आली. यामुळे अन्नधान्य उत्पादनात घट झाली व महागाई वाढल्याने शेतकऱ्याचे दारिद्रय वाढले. काही प्रसंगी भारतीय शेतकरी आपल्या जमिनी विकु लागले व गहान ठेवू लागले. जास्त पैसा मिळवण्यासाठी नगदी पिकाचे उत्पादन घेऊ लागल्याने शेतीचे व्यापारीकरण मोठया प्रमाणात घडुन आले. पण या व्यापारीकरणाने शेतीची दुरावस्था वाढतच गेली उत्पादन संबंध गरजेशी न राहता तो नफा या घटकाभोवती केंद्रित झाला. मात्र हा नफा भारतीयांना न मिळता इंग्रजांनामिळत होता. तत्कालीन व्यापारीकरण हे शेतकऱ्यांच्या दृष्टिने फायदयाचे नव्हते. स्वावलंबी शेतकरी परावलंबी बनला. शेतीचे व्यापारीकरण करुन हा शोषणाचा एक मार्ग ब्रिटिशांनी उपयोगात आनला.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 147 (I) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

**2. ब्रिटिश कालीन भारतातील जल सिंचन व्यवस्थाः-**

भारतीय शेती ही निसर्गावर (मान्सुन पर्जन्यावर) अवलंबुन आहे. परंतू पर्जन्याची अनियमितता, वितरणातील विषमता, लहरीपणा इत्यादी मुळे कृषी विकासात सातत्य राखणे कठीण जाते. वेगवेगळया प्रदेशातील कृषी उत्पादन हे पुर्णपणे जलसिंचनावरच अवलंबुन आहे. पाणी हे शेतीचे जीवन असल्यामुळे हरितक्रांती मध्ये सर्वाधीक महत्व प्राप्त झाले आहे.

कृषी मध्ये जलसिंचनाला अनन्य साधारण महत्व आहे. अगदी प्राचीन काळी जेंव्हा लोकसंख्येची घनता कमी होती. तेंव्हा पाणी नदयामध्ये वाहत होते. हे पाणी कृषी व मानवी जीवनालाही पुरेशे होते व जशी लोकसंख्येत वाढ होत गेली व मानवाच्या राहणीमानाचा दर्जा वाढला तशी पाण्याची आवश्यकता देखील वाढली व पाण्याचे स्त्रोत कमी पडत गेले. यामुळे पाणी साठवण्याची संकल्पना म्हणून तलाव बांधण्याची व तलावामध्ये साठलेले पाणी कालव्याद्वारे वापरण्याची व्यवस्था निर्माण होऊन इतर मोसमामध्ये पाण्याचा वापर होत गेला. जलसिंचनामध्ये पाण्याचा कृत्रिमरित्या शेतीसाठी उपयोग केला जातो. त्याचा मुख्य उद्देश म्हणजे पाणी पुरवठा करुन पिकाची उत्पादकता वाढविणे होय.

स्वातंत्र्यानंतर भारतीय कृषी विकासाला जास्त प्राधान्य देण्यात आले. कृषी उत्पादनामध्ये सातत्य राखण्यासाठी जलसिंचनावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले पण स्वातंत्रतापुर्व काळात ब्रिटिश सरकारने तुटपुंज्या स्वरुपात जलसिंचनाच्या सुधारणा केल्याचे दिसून येते. फक्त स्वार्थापोटी व सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे जनतेत वाढलेला असंतोष कमी व्हावा म्हणून काही तुरळक ठिकाणी जलसिंचनाच्या सुविधा घडवून आणल्याचे दिसून येते.

निसर्गाचा अनियमितपणा हा शेतीला मिळालेला शाप आहे. शेतीच्या उत्पादनातील सर्वात मोठी जोखीम म्हणजे पर्जन्याचे अनिश्चित प्रमाण ज्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न शेवटपर्यंत अनिश्चित राहते. " भारतीय परिस्थीती बाबत असे म्हटले जाते की, येथे सरासरी पाच वर्षाचा विचार केल्यास त्यापैकी तीन वर्ष यथा तथा असतात. एक वर्ष अतिषय वाईट म्हणजे दुष्काळाचे असते. तर एक वर्ष चांगले असते."[8] हे चित्र बदलण्यासाठी कृत्रिम पाणी पुरवठयाची गरज असते. पण ब्रिटिश सरकारने याकडे दुर्लक्ष केले.

एकोनिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात भीषण दुष्काळ पडल्यामुळे नाईलाजाने किमान संरक्षक पाटबंधारे योजणा हाती घ्याव्या लागल्या. प्रामुख्याने उत्तर भारतामध्ये कालवे बांधून सिंचनाची सोय करण्यात आली यामध्ये नदीचे पाणी अडवून जलाशय तयार करण्यात आले. त्यातील पाणी आवश्यकते प्रमाणे कालव्यामधून सोडून शेतीला दिले जाई त्यामुळे धान्यांचे उत्पादन वाढण्यास मदत झाली. व दोन ते तीन पिके घेणे शक्य झाले. "ब्रिटिशांनी भारतातील कृषी सुधारणेकडे दुर्लक्ष केले होते. पण अपवादात्मक प्रायोगीक तत्वावर काही ठिकाणी शेतीची सुधारणा केल्याचे दिसून येते. पंजाब संयुक्त प्रांत आणि मद्रास या प्रदेशातील काही भागात पाठाद्वारे पाणी पुरवठा करण्याची तुटपुंजी व्यवस्था केल्याचे दिसून येते"[9] व त्या केलेल्या व्यवस्थेतुनही ज्या शेतकऱ्यांना शेतीसाठी कालव्याचे पाणी मिळाले त्यांच्यावर प्रचंड प्रमाणात महसुल बसवून मोठया प्रमाणात फायदा करुन घेतला. "1867 नंतर ब्रिटिश शासनाने स्वतंत्र पाटबंधारे विभाग स्थापन करुन बांधकाम संघटना तयार केली. व 1869 मध्ये दहा वर्षासाठी सर्वंकश सिंचन विकास नियोजन तयार केले व महाराष्ट्रातील पहिले मोठे सिंचन काम म्हणजे 1870 साली सुरु झालेल्या कृष्णेचा कालवा होय"[10] खोडशी येथे एक बंधारा घालुन कृष्णा नदिचे पाणी कालव्याद्वारे वापरले आहे. जलसंचय करुन त्यातुन काढलेल्या कालव्याची सुरुवात म्हणजे मुठा नदीवर खडकवासला येथे धरण बांधून तेथून काढलेले कालवे हीच होय 1875 मध्ये या धरणाचे काम पुर्ण झाले.

पाटबंधारे योजने अंतर्गत विहार(1860), पवई तुळशी(1876) व तानसा(1883) प्रकल्प उभा करुन मुंबईसाठी पिण्याचे पाणी व औधोगीक वापरासाठी हे धरण बांधले गेले. तसेच 1885 ला भाटघर धरण पुर्ण झाले व निरा नदीच्या डाव्या बाजुचा कालवा सुरु झाला. तसेच सातारा जिल्हयात म्हसवड तलाव (1876) मान नदिवर तयार केला. अशा प्रकारे ब्रिटिशांनी भारतात काही तुरळक ठिकाणी कालवे, पाटबंधारे, धरणे बांधून जनतेचा असंतोष कमी करण्याचा प्रयत्न केला व त्यातूनही आपला जास्तीत जास्त फायदा कसा होईल याच दृष्टीने जलसिंचनाच्या सोयी केल्याचे दिसून येते.

**3. मुल्यमापन/ समारोपः-**

इंग्रजांनी आमलात आनलेल्या भू-व्यवस्थेमुळे भारतातील प्रचलीत भू-व्यवस्था कोलमडून पडली. वेगवेगळया महसुलाच्या पध्दतीचा वापर करुन मोठया प्रमाणात महसुल गोळा केला व तो महसुल हा रोख पैश्याच्या रुपाने देण्याची सक्ती करण्यात आल्याने जमीन कसणारा शेतकरी अडचणीत आला. महसुल भरण्यासाठी प्रसंगी तो जमीन विकू व गहाण ठेवू लागला. परिणामी कृषी व्यवस्थेतील स्थैर्य, सातत्य नष्ट होऊन ग्रामीण व्यवस्थाच नव्या भुमीव्यवस्थेमुळे मोडकळीस आली. "या व्यवस्थेमुळे खेडयांची स्वंयपुर्णतः नष्ट पावली. भारतातील कुटीर उदयोग नष्ट पावले व खेडयात सर्वाधीक महत्व जमीनीला प्राप्त झाले. या व्यवस्थेमुळे शेती व शेतकरी अस्थीर बनले. परिणामी खेडयामध्ये सावकार व अनुपस्थीत जमीनदार हे दोन घटक अस्तीत्वात आले. ब्रिटिश काळात या व्यवस्थेमुळे संपुर्ण भारतामध्ये जमीनीला विक्री व गहाण ठेवणे आणि हस्तांतरीत होणारी वस्तू बनवले गेले."[11] या कृषी व्यवस्थेमुळे भारतीय शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात आर्थिक शोषन झाले.

ब्रिटिश सरकारने भारतात केलेल्या सिंचन व्यवस्थेतून जास्तीत जास्त आपला फायदा कसा होईल याकडेच जास्त लक्ष दिल्याचे दिसून येते. जलसिंचन योजना राबवलेल्या परीसरातील शेतकऱ्यावर मोठया प्रमाणावर महसुल आकारला व त्या ठिकाणी नगदी पीकांना प्राधान्य दिले. नगदी पिकांच्या लागवडीमुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण झाल्याने येथील लोक महागाई उपासमारी व दारिद्रयात जिवन जगू लागल्याचे दिसून येते. तसेच त्यांनी बनवलेली बंधारे व कालवेही निकृष्ट दर्जाची होती. कालव्याद्वारे पाणी पुरवठा करताना ती मातीची असल्याने शेतीला पाणी व्यवस्थीतरित्या मिळतही नसे.

अशा प्रकारे एकंदरीतत अभ्यासांती असे दिसून येते की, ब्रिटिश काळात भारतीय शेती व शेतकरी या दोन्ही घटकांची घोर उपेक्षाच झालेली दिसून येते. भारतीय शेतकरी हा गरीबी, उपासमारी व दारिद्रयात आपले जीवन जगत असल्याने दिसून येते. ब्रिटिश कालीन कृषीधोरण पाहिले तर शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारल्याचे दिसत नाही. शेतकऱ्यांच्या पुर्वीच्या समस्या या काळात सुटल्या तर नाहीत उलट त्या अधिक गंभीर मात्र झाल्याचे दिसून येते.

संदर्भ सुची :-

1. रजनी पाम दत्त- इंडिया टुडे, डायमंड पब्लिकेशन, पुणे. प्रथमावृत्ती 2006 पृ.क्र.483
2. दिनेश मोरे- आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के सागर पब्लिकेशन, पुणे. प्रथमावृत्ती 2004 पृ.क्र.95
3. सुमन वैध्य, शांता कोठेकर- आधुनिक भारताचा इतिहास,(1757-1857) श्री साईनाथ पब्लिकेशन, नागपुर. प्रथमवृत्ती 1996 पृ.क्र.276
4. डॉ.धनंजय आचार्य - आधुनिक भारत (1750-1950) श्री साईनाथ पब्लिकेशन, नागपुर. प्रथमवृत्ती जून 2006 पृ.क्र.117
5. बि.एल.ग्रोवर- आधुनिक भारताचा ईतिहास. एस.चंद्र.आणि कंपणी लिमीटेड, नवी दिल्ली प्रथमावृत्ती 2003 पृ.क्र.198
6. बि.एल.ग्रोवर आधुनिक भारताचा ईतिहास. एस.चंद्र.आणि कंपणी लिमीटेड, नवी दिल्ली प्रथमावृत्ती 2003 पृ.क्र.124
7.डॉ.श्रीनिवास सातभाई, आधुनिक भारताचा इतिहास (1762-1950) विद्याबुक पब्लिकेशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती 2008 पृ.क्र.128
8.डॉ.विजय कविमंडल – कृषी-अर्थशास्त्र. श्री मंगेश पब्लिकेशन, नागपुर.द्वितीय आवृत्ती 2002 पृ.क्र.194
9. सुमित सरकार आधुनिक भारत - राजकमल पब्लिकेशन नवी दिल्ली. प्रथमावृत्ती 1993 पृ.क्र.54
10. महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल – खंड 1, तात्वीक विवेचन, महाराष्ट्र शासन. पृ.क्र.30
11. विपीन चंद्र- आधुनिक भारत का इतिहास, ओरीएंट ब्लॅक स्वॅन पब्लिकेशन, नवी दिल्ली प्रथमावृत्ती 2009 पृ.क्र.93

Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*Multidisciplinary International Level Referred Journal*

**December-2021 Volume-12 Issue-24**

## *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

| Chief Editor | Editor |
|---|---|
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**



**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

| | | |
|---|---|---|
| 18 | राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व शैक्षणिक विचार<br>डॉ. एस. एस. देवनाळकर | 54-55 |
| 19 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक योगदान<br>प्रा. पांढरे विलास देवराव | 56-62 |
| 20 | थोर समाज सुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज<br>डॉ.सुधीर ब.गायकवाड | 63-66 |
| 21 | राजर्षी शाहू महाराज : शैक्षणिक व आर्थिक कार्य<br>प्रा. अमोल देविदास दिवटे | 67-72 |
| 22 | डॉ. आंबेडकरांची पत्रकारीता आणि राजकीय चिंतन<br>प्रा. डॉ. अरूण विठ्ठल सोनकांबळे | 73-77 |
| 23 | महात्मा फुले यांचे मराठी साहित्याला योगदान<br>प्रा.अरविंद बन्सी इंगळे | 78-80 |
| 24 | डॉ बी आर अम्बेडकर का आर्थिक विचार और योगदान<br>डॉ अर्जुन मोहनराव मोरे | 81-83 |
| 25 | स्त्री मुक्ती आंदोलनातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>प्रा डॉ अंकुश मारुती सोहनी | 84-87 |
| 26 | राजर्षी शाहू महाराजांचे समाजपरिवर्तनातील शैक्षणिक कार्य<br>प्रा. डॉ.खलील न. सय्यद | 88-90 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सबलीकरण<br>Suman Kendre | 91-93 |
| 28 | महात्मा ज्योतिना फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचार<br>डॉ. गव्हाणे रमाकांत बबनराव | 94-95 |
| 29 | राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्री-उद्धारविषयक विचार व कार्य<br>श्री योगेश ज्ञानदेव पाटील | 96-98 |
| 30 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिविषयक विचार<br>डॉ सुरेश त्रिंबकराव सामाले | 99-102 |
| 31 | छत्रपती शाहू महाराज आणि महिला सक्षमीकरण<br>डॉ निलेश गोकुळ शेरे | 103-106 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक आर्थिक विचारांचे अध्ययन<br>श्री. एव. व्ही. केळे , डॉ. डी. सी. रसाळ | 107-110 |
| 33 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कार्य<br>प्रा तुळशीदास मोकल | 111-113 |
| 34 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक विचार<br>प्रा देवशेट्टे सुरेश मनोहरराव | 114-116 |
| 35 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>रेवडकर गणेश सुभाष | 117-118 |
| 36 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार<br>प्रा. जगदीश रामभाऊजी वाटमोडे | 119-121 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal. Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-24
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# ''महात्मा ज्योतिबा फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचार''

डॉ. गव्हाणे रमाकांत बबनराव
श्री. शरदचंद्रजी पवार वरिष्ठ महाविद्यालय,नारंगवाडी ता. उमरगा जि. उस्मानाबाद

प्रस्तावना :—
भारत हा कृषी प्रधान देश म्हणुन ओळखला जातो. त्यामुळे इथला शेतकरी आणि शेती हा देशाचा कणा आहे. प्राचीन काळापासुन भारतीय शेतकरी शेतीचा व्यवसाय करीत असुनही आधुनिक युगामध्ये तो मागासलेला राहिला. समाजात बहुसंख्येने असणारा परंतु अतिशय वाईट अवस्था प्राप्त झालेल्या शेतकरी वर्गाविषयी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी राज्यकर्ते, समाजसुधारक व विचारवंतांना चिंता वाटत होती. शेती आणि शेतीवरती उपजिविका करणारा शेतकरी त्यांच्या आत्मीयतेचा विषय होता. ब्रिटिश सरकारने या शेतकरी वर्गाचे कसे शोषण केले व शेतकरी कसा दयनीय अवस्थेत जिवन जगु लागला. दारिद्रय व कर्जबाजारीपणापासुन शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी कांही राज्यकर्त्यांनी शेतीविषयक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. तर कांही समाजसुधारकांनी शेती व शेतकरी वर्गाचा दर्जा सुधारण्यासाठी आपले विचार मांडुन शेतकऱ्यांसाठी कांही सुधारणा घडवुन आणण्याचा प्रयत्न केला. त्यात महात्मा फुले यांचे नांव आग्रक्रमाने येते.

**शोध निबंधाची उद्दिष्टये :—**

1. भारतीय शेतकऱ्यांच्या मागासलेपणाची माहिती घेणे.
2. भारतीय शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आर्थिक शोषणाची माहिती घेणे.
3. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास महात्मा फुले यांनी ब्रिटिश सरकारला कसे भाग पाडले याची माहिती घेणे.
4. महात्मा फुले शेती व शेतकरी वर्गाची सुधारणा व्हावी. म्हणुन कोणते विचार मांडले याची माहिती घेणे.
5. महात्मा फुलेंच्या शेती व शेतकरी विषयक कार्याची माहिती घेणे.

**शोध निबंधाची गृहितके :—**

1. महात्मा फुले यांची शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले.
2. शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेची माहिती ब्रिटिश सरकारला दिली.
3. ब्रिटिश सरकारच्या काळात शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणुक मोठया प्रमाणात झाली.
4. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पण शेती मागास राहिली.

**विषय प्रतिपादन :—**

१९ व्या शतकात भारताच्या इतिहासात आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकिय क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडून आल्या. ब्रिटिशांची भारतावरील जुलमी व अनियंत्रीत सत्तेचा परिणाम म्हणुन भारताची सर्वच क्षेत्रात अतिशय विकलांग अशी अवस्था झाली होती. 'ब्रिटिशांच्या शोषणातून शेतीही सुट्ट शकली नव्हती. भारतीय शेती व शेतकऱ्यांचे अतिशय नियोजन बध्द शोषण ब्रिटिशांनी सुरू केले. महात्मा फुले यांनी शिक्षणाला महत्त्व देऊन शिक्षणा अभावी शुद्राती शुद्रांचे कसे नुकसान झाले आहे व शेतकरी कसा नागवला जात होता हे सांगण्यासाठी ज्योतीरावांनी 'शेतकऱ्यांचा आसुड' हा ग्रंथ इ.स. १८८३ साली लिहिला.''[१] व त्याद्वारे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारला लक्ष देण्यास भाग पाडले.

**महात्मा फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचार :—**

ब्रिटिश सरकार भारतीय शेतीवर मोठया प्रमाणात महसुल आकारत त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांची मोठया प्रमाणात आर्थिक पिळवणुक झाली. ''सन १८७१ साली महसुल, कृषी व वाणिज्य असे एक स्वतंत्र खाते निर्माण केले.''[२] पण या खात्यांमार्फत सुधारणा ऐवजी फक्त महसुलाच्या रूपात मोठया प्रमाणात कर आकारणी होऊ लागली. ''महात्मा फुले यांनी आपली भाषणे व ग्रंथाद्वारे शेतकरी व कामगार यांची पिळवणुक कशी होते. दारिद्रयाच्या चिखलात कसे अधिकाधिक रूतत चालले आहेत, सामाजिक अन्यायाखाली ते कसे पिचत चालले आहेत हे त्यांना सरकारच्या लक्षात आणुन दयायचे होतो.''[३] शेतकरी, कष्टकरी, शुद्राती शुद्रांच्या कल्याणासाठी फुलेंनी सर्व स्तरातुन प्रयत्न केले होते. त्यांनी आपल्या कार्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ''२४ सप्टेंबर १८७३ रोजी ''सत्यशोधक समाजाची'' स्थापना केली. या समाजाचे ध्येय शेतकरी, कामगार यांच्या उद्धाराचे असल्यामुळे त्यांचे विचार आणि कार्य याच वर्गाच्या प्रश्नासी निगडीत होते.''[४]

''शेतकऱ्यांच्या भल्यासाठी स्थापना केलेल्या ''सत्यशोधक समाजाने'' त्या काळात एक निबंध स्पर्धा जाहीर केली. त्यासाठी दोन बक्षीसे ठेवली. 'हिंदी शेतकऱ्यांची सुधारणा कशी करता येईल?.'' हा निबंधाचा विषय होता. ब्रिटन मधील शेतकी पध्दत लक्षात घेऊन हा निबंध लिहायचा होता. या निबंधावरून सत्यशोधक समाजाचे कार्य कोणत्या पध्दतीचे होते आणि महात्मा फुले यांचा दृष्टिकोन कसा व्यापक व विधायक आणि आर्थिक दृष्टया कसा महत्त्वाचा होता. याची कल्पना येते.''[५]

'शेतकऱ्याचा असुड' याच ग्रंथात महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दुर्दशेचे वर्णन केले आहे. ''त्याचे घर एक मजला कौलारू आहे. घराचे पुढचे बाजुस घरालगत आढेमेढी टाकुन बैल बांधण्याकरीता छप्पराचा गोठा केला आहे. त्यात दोन—तीन उठवणीस आलेले बैल रवंथ करीत बसलेले आहेत. व एका बाजुला खंडी—सव्वाखंडीच्या दोन—तीन रिकाम्या कणगी कोपऱ्यात पडल्या आहेत. बाहेर अंगणात उजवे बाजुस एक आठ बैली जुना गाडा उभा केला आहे. त्यावर मोडकळीस आलेला तुरवंठयांचा कुरकुल पडला आहे. डावे बाजुस एक मोठा चौरस ओटा करून एक तुळशी वृंदावन बांधले आहे. व त्यालगत खापरी रांजनाच्या पाणईच्या ओटा बांधला आहे. पाणई शेजारी तीन बाजुला छाट दिवाली बांधुन त्याचे आत ओबाड—धोबाड फरशा टाकुन एक लहानशी न्हाणी केली आहे. तिच्या मोरीवाटे वाहून गेलेल्या बाहेरच्या बाजुस डबके साचले आहे. त्यात किडयांची बुचबुच झाली आहे. त्यांचे पलीकडे पांढऱ्या चाफयाखाली उघडी—नागडी सर्व अंगावर पांढरे

पाण्याचे ओघळाचे डाग पडलेले असुन, खर्जुली, डोक्यात खवडे, नाकाखाली शेंबडाच्या नाळी पडून घामट अशा मुलांचा जमाव जमला आहे....''[6] अशा प्रकारचे दशावतारी वर्णन ज्योतीरावांनी असुड मध्ये केले आहे.

फुलेंनी शेतकऱ्यांची दुर्दशा संपवण्यासाठी शेती व्यवसायात सुधारणा घडवुन आणण्यासाठी इंग्रज सरकारकडे अनेक मागण्याही केल्या. ''आमच्या दयाळू सरकारने एकंदर सर्व शेतकऱ्यास युरोपीयन शेतकऱ्यांसारखे विद्याज्ञान देऊन, त्यांस त्यांसारखी यंत्राद्वारे शेती कामे करण्यापुरती समज येई तो पावेतो एकंदर सर्व गोऱ्या लोकांसह मुसलमान वगैरे लोकांनी हिंदुस्थानातील तूर्त गाय बैलासह त्यांची वासरे कापून खाण्याच्या ऐवजी, त्यांनी येथील शेळया, वकरी मारून खावीत, अथवा परमुलखातील गाय, बैल वगैरे खरेदी करून येथे आणुन मारून खावे, म्हणुन कायदा करून अमलात आणल्याशिवाय येथील शुद्र शेतकऱ्यांजवळ बैलांचा पुरवठा होऊन त्यांना आपल्या शेतांची मशागत भरपुर करता येणार नाही. व त्यांच्याजवळ शेणखताचा पुरवठा होऊन त्यांचा व सरकारचा फायदा होणे नाही. एकंदर डोंगर पर्वतावरील गवत झाडांच्या पान फुलांचे व मेलेल्या किटक श्वापदांचे मांस, हाडांचे कुजलेले सत्व वळवाच्या पावसाने धुपून पाण्याच्या पुराबरोबर वाहून ओढया खोडयात वाया जाऊ नये, म्हणुन आमच्या उदयोगी सरकारने सोयी सोयीने काळया गोऱ्या लष्करासह पोलीस खात्यातील फालतु शिपायाकडुन जागोजाग तालीवजा बंधारे अशा रितीने बांधावे व वळवाचे पाणी एकंदर शेतातून मुरून नंतर नदी नाल्यास मिळावे, असे केल्याने शेते फार सुपीक होऊन एकंदर सर्व लष्करी शिपायांस हवाशीर जाग्यात उदयोग करण्याची सवय लागल्याबरोबर त्यास रोगराईची बाधा न होता बळकट होतील.''[7]

शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी ज्योतीरावांनी केलेल्या वरील मागण्या पाहिल्यावर त्यांनी शेतकरी वर्गाच्या उन्नतीचा किती बारकाईने अभ्यास केला होता. याची प्रचिती येते. शेतकऱ्यांचे शोषण थांबुन तो ज्ञानी बनावा, तो आपल्या हक्काविषयी जागरूक बनावा व त्याचे राज्य (बळीचे राज्य) यावे हे ज्योतीरावांचे स्वप्न होते.

**मूल्यमापन :–**

महात्मा फुले यांच्या मते, जो पर्यंत शेती आणि शेतकऱ्यांच्या हिताची धोरणे राबविली जाऊ शकत नाहीत तो पर्यंत या देशात कोणतेही मौलिक स्वरूपाचे परिवर्तन होऊ शकणार नाही हे १२० वर्षापूर्वी महात्मा ज्योतिबा फुले यांनी आणि त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते. परंतु ब्रिटिश कालखंडात शेतकऱ्यांची घोर निराशाच केली ही अत्यंत खेदांची बाब असुन भारताच्या दारिद्रयाचे प्रमुख कारण आहे.महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. शेतकऱ्यांवर होणारे अन्याय दुर करण्याचा प्रयत्न केला. वास्तवाच्या आधारे एखादे गृहीत उभी करण्याची शैली महात्मा ज्योतीराव फुले शिवाय इतर कोणाला साधली नाही. यासाठीच त्यांना देशातील शेती प्रश्नांचे प्रवक्तेपण दयावे लागते.

**संदर्भसूची :–**

१) डॉ. एस. एस. गाठाळ – आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. पृ.क्र. ३३०
२) पवार जयसिंगराव – आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास – विद्या प्रकाशन, नागपूर. २०००. पृ.क्र.२६२
३) किर धनंजय – महात्मा फुले – पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. १९९२. – पृ.क्र. १४४
४) पवार जयसिंगराव – आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास – विद्या प्रकाशन, नागपूर. २०००. पृ.क्र.२६२
५) किर धनंजय – महात्मा फुले – पृ. क्र. १६१
६) ज्योतीराव गोविंदराव फुले (संपा. डॉ. एस.एस.भोसले) – शेतकऱ्यांचा असुड, जिजाऊ प्रकाशन, औरंगाबाद. २००१. पृ. क्र. ११
७) महात्मा फुले – समग्र वाङमय – (महाराष्ट्र शासन). पृ. क्र. ३३२, ३३३.

I. –––

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

02nd February 2019 Special Issue – 113

# Environmental Awareness & Socio-economic development in Rural Area: Issues, Problems and Remedies

**Chief Editor**
**Dr. Dhanraj T. Dhangar**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
**Dr. H.N. Rede**
Principal
B.S.S. Arts, Science & Commerce College,
Makni, Tq. Lohara, Dist. Osmanabad (M.S)

**Co-Editor**
**Prof. K.A. Lomte**
**Dept. of English**
B.S.S. Arts, Science & Commerce College,
Makni, Tq. Lohara, Dist. Osmanabad (M.S)

49. Pesticides and Integrated pest management of agricultural & horticultural economy from Beed district (M.S.) India. 153
**M.K. Kale , P.P.Gaike, V.S.Kandhare**

50. Causes And Solutions Of Environmental Changes In India 156
**Dr. Mehatre Meena Gitaram**

51. Agro-Based Industries and Challenges in India 159
**Maharudra Bibhishan Khose , Mr.Santosh S.Sirsat**

52. बदलत्या हवामानाचा पर्यावरण व समाजव्यवस्थेवर होणारा परिणाम 163
**प्रा. शरद शंकर गायकवाड**

53. पर्यावरण संतुलनात वनसंपदेची भुमिका 166
**प्रा.डॉ.गव्हाणे रमाकांत बबनराव**

54. नदीजोड प्रकल्प : अवर्षण व पूर व्यवस्थापनाचा पर्याय 168
**प्रा.डॉ. वाघमारे हरी साधू**

55. पर्यावरण आणि समाज 170
**प्रा. पि.एम. शिंदे**

56. साहित्यातील पर्यावरण 173
प्रा.पसरकल्ले समाधान

57. वैश्विक तापमान वृध्दि : चुनौतियाँ एवं समाधान 175
**प्रा.प्रकाश बन्सीधर खुळे**

58. भारतातील पाणी प्रश्न आणि राजकारण 178
**प्रा.आचार्य व्ही.डी.**

59. भारतातील बदलत्या पर्यावरणाच्या समस्या 181
**प्रा. डॉ. यशवंत आर. वळवी**

60. 'पर्यावरण और जल प्रदुषण' 183
**डॉ बोईनवाड एन. एन.**

61. भारतातील पर्यावरण प्रदूषण व त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या : एक ऐतिहासिक आढावा 186
**प्रा. चिकटे व्यंकट दगडू**

62. हिंदी कविता में प्रकृति के रुप 188
**डॉ.सन्मुख नागनाथ मुच्छटे**

63. छत्रपती शिवाजी महाराजांचे पर्यावरण विषयक धोरण 191
**प्रा.डॉ. पाटील विनायक उध्दवराव**

**RESEARCH JOURNEY** International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | Special Issue -113 | February 2019 | UGC Approved No. 40705
Environmental Awareness & Socio-economic development in Rural Area :Issues, Problems & Remedies

# पर्यावरण संतुलनात वनसंपदेची भुमिका

**प्रा.डॉ.गव्हाणे रमाकांत बबनराव**
श्री शरदचंद्रजी पवार वरिष्ठ महाविद्यालय, नारंगवाडी ता. उमरगा जि. उस्मानाबाद

---

**प्रस्तावना:**

पृथ्वीच्या नंतर ज्यावेळेस मानवाची निर्मिती झाली तेंव्हा पासून मानव व पर्यावरण यांच्यामध्ये सहसंबंध आहे. पर्यावरण हे निर्सगाने दिलेले वरदान आहे. पृथ्वीवर विभिन्न ठिकाणी विभिन्न खंडावर भिन्न भिन्न प्रकारचे पर्यावरण आहे. प्रत्येक ठिकाणच्या नैसर्गिक पर्यावरणाच्या आधारावर मानव स्वःताचे जिवन उज्वल व विकसित करण्याचा प्रयत्न करतो त्यामुळे मानवाने पर्यावरणासोबत समाज योजनेचे कार्य करणे गरजेचे आहे. "18 व्या शतकात जगामध्ये औधोगीक कांती झाल्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये विकास झाला हे जरी खरे असले तरी निसर्गाच्या समतोला बाबत मानवाचे दुर्लक्ष झाले."[1] विभिन्न भागामध्ये पर्यावरणाचा ऱ्हास मोठया प्रमाणात सुरु आहे.

आज प्रत्येक व्यक्तीच्या अमर्याद गरजामुळे नैसर्गिक साधनसंपदावर मोठया प्रमाणावर ताण पडत चालला आहे. त्यामुळे प्रकृतीचे सौंदर्य नष्ट होत चालले आहे. व मानवाला अनेक नैसर्गिक आपत्तीना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पर्यायाने पर्यावरणाचा ऱ्हास दिवसे दिवस वाढत आहे. पर्यावरण संतुलीत राहण्यासाठी जेवढया प्रमाणात वनसंवर्धन करणे गरजेचे आहे तेवढया प्रमाणात वनसंपदा टिकवुन ठेवली जात नाही त्यामुळे पर्यावरणाला हाणी पोहंचत आहे. पर्यावरण संतुलीत ठेवण्यासाठी वनसंवर्धन करणे गरजेचे आहे.

**अर्थ व स्वरुप :**

पर्यावरण ही संकल्पना शास्त्रीय दृष्टया बहूव्यापक बहुसमावेशक व बरीच गुंतागुंतीची आहे. व्यूत्पत्तीशास्त्राच्या दृष्टीने. "पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील विशिष्ट भागाशी निगडीत असलेली सभोवतालची परिस्थिती **'Environ'** या मुळ फ्रेंच शब्दापासून इंग्रजी **Environment** असा शब्द प्रचलित झाला यालाच मराठीत पर्यावरण असे म्हणतात."[2] थोडक्यात पर्यावरण म्हणजे सभोवतालची परिस्थिती होय.

पर्यावरण ही संज्ञा स्थल व काल सापेक्ष आहे. असे म्हणणे उचित ठरेल. पर्यावरण हे काळानुसार बदले आहे. पृथ्वी गोलाचे पर्यावरण समजून घेणे व मानवी जिवनाचा त्या पर्यावरणावर काय परिणाम होतो, पर्यावरणीय समस्याचे निराकारण कसे करते येतील यासाठी अनेक संस्था एकत्र येत आहेत. व पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. "पर्यावरणातील मानवाच्या अतिरेकी हस्तक्षेपामुळे प्रदुषण, नागरीकरण, उर्जाक्षय, वृक्षतोड, अवर्षन ओझोनक्षय या सारख्या भयानक समस्या निर्माण झाल्या आहेत."[3] या अनेक समस्या जगातील अनेक देशांना भेडसावू लागल्याने "आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण विषयक पहिली जागतीक परिषद 1971 मध्ये स्वीडन मधील स्टॉकहोम या शहरात भरली"[4] या परिषदेत भारतासह लहान मोठया राष्ट्राच्या प्रतिनिधीनी सक्रीय सहभाग घेतला व वरील विविध पर्यावरणीय समस्यांचा या परिषदेत ऊहापोह झाला. तेथूनच जगभर पर्यावरण चळवळीला जाहीर वाचा फुटली पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन हेच मानवासह आखिल सजीव निर्जीव सृष्टीचे भविष्यकालीन अस्तित्व हा मुलमंत्र साकार झाला. पर्यावरणाच्या संतुलणासाठी सर्वांनीच एकत्रितपणे झटण्याची गरजही त्यातुन प्रतीत झाली. व आज जगात 100 पेक्षा जास्त देशात 5 जून हा जागतीक पर्यावरण दिन म्हणून साजरा करतात.

**वनसंपदा व पर्यावरण :**

वनसंपदा ही पृथ्वी तलावरील एक महत्वाची साधनसंपदा आहे. प्राकृतीक रचना, भूप्रदेशाचा विस्तार समुद्रसपाटी पासूनची उंची,पर्जन्य,तापमान आणि जमीन या बाबतीत पृथ्वी तलावर फारच विविधता असल्याने वनामध्येही फारच विविधता दिसून येतात कारण वरील सर्व घटकांचा वनांच्या वाढीवर व विवकासावर परिणाम होत असतो.

वनसंपदेला मानवी जिवनात अनन्यसाधारण महत्व आहे. मानवाच्या अनेक गरजा वनसंपदेमधूनच भागविल्या जातात. काही आदिवासी जमातीचे तर पूर्ण जीवनच वनसंपदेवर अवलंबून असते. त्यांच्या अन्न,वस्त्र व निवारा या मुलभुत गरजा वनामधून भागवल्या जातात. तसेच विविध वनाधारित उदयोगांना लागणारा कच्चा मालही वनामधूनच प्राप्त होतो.

वनसंपदा पर्यावरण संतुलनासाठी अत्यंत महत्वाची आहे." कोणत्याही प्रदेशात पर्यावरण संतुलीत राहण्यासाठी एकुण भुप्रदेशापैकी किमान 33 टक्के भूप्रदेश वनांच्या आच्छादनाखाली असणे आवश्यक आहे."[5] जर या पेक्षा कमी भूप्रदेश वनाखाली असेल तर पर्यावरण संतुलनात बिघाड निर्माण होऊन अनेक गंभीर समस्या निर्माण होतात. सध्या जगातील अनेक देशामध्ये प्रचंड प्रमाणात वनांची तोड झाल्यामुळे वनांखालील क्षेत्रात घट होऊन अनेक पर्यावरण समतोल मोठया प्रमाणात ढासळला आहे. यामुळे अनेक पर्यावरणीय समस्या गंभीर स्वरुपात निर्माण झाल्या आहेत. उदा. पर्जन्य प्रमाणात घट, तापमानवृध्दी, कार्बनडायऑक्साईड मध्ये वृध्दी, ओझोनक्षय, वन्यप्राण्याचा ऱ्हास, वाळवंटीकरण,मृदाधूप, महापूर इत्यादी. या समस्यामुळे जीवसृष्टीच्या अस्तीत्वाला धोका निर्माण झाला आहे.

"अनादी काळापासून मानव लाकडाचा उपयोग करत आहे. लाकडाचा उपयोग प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या होतो. आज खूप मोठया प्रमाणात लाकुडतोडीचे प्रमाण जंगलतोडीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे वेगवेगळया पर्यावरणीय आपत्ती निर्माण झाल्या"[6] जंगल तोडीमुळे मानवाला कोणकोणत्या समस्यांना तोंड दयावे लागत आहे. या गोष्टीची पर्वा त्यांना नसते. त्यांचे पर्यावरण व मानवावर कोणते परिणाम होतात. यांची पर्वा नसते या प्रचंड वृक्षतोडीमुळे अनेक समस्या निर्माण होतात व पर्यावरण संतुलन बिघडते.

"लाकुडतोड हा प्राथमिक श्रेणीतील एक महत्वाचा व्यवसाय असून तो जंगलावर आधारित आहे त्यामुळे जंगलयुक्त प्रदेशात राहणारे लोक हा व्यवसाय करतात. प्रामुख्याने घरगुती इंधनासाठी, उदयोगधंदयांकरिता, इमारतीकरीता, जहाजबांधणी करीता, रेल्वे

स्लिपर्स, वाहणे, कृषी अवजारे, कागदाचा लगदा, इत्यादी साठी मोठया प्रमाणात लाकुडतोड केली जात आहे."[7] त्यामुळे दिवसे दिवस पर्यावरणातील समतोल बिघडत चालला आहे. त्यामुळे मानवाला त्यापासून अनेक समस्यांना तोंड दयावे लागत आहे.

**पर्यावरण संतुलनात वनसंपदेचे महत्व/भूमिका**

वनसंपदेपासून मानवाला प्रामुख्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरुपाचे फायदे मिळतात "वनसंपदेपासून मानवाला खादय पदार्थ,वस्त्र,औषधी पदार्थ, पाने, डिंक, लाख,टॅनिन, अर्पेन्टाईन, विविध तेल प्राप्त होतात. तसेच वनसंपदेमुळे पर्यावरण संतुलन राखले जाते."[8] पर्यावरण संतुलनात वनसंपदेचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. वनसंपदेचा ऱ्हास म्हणजेच पर्यावरणाचा ऱ्हास होय. म्हणून वनसंपदा हा घटक पर्यावरण टिकवण्यासाठी अत्यंत महत्वाचा आहे.

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वनसंपदेचे महत्व किंवा त्याचे मिळणारे फायदे अनेक आहेत. ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. **पर्जन्यात वाढ :** वनामुळे पर्जन्यात वाढ होण्यास मदत होते ज्या भागात वने आहेत तेथे थंड हवेमुळे सांद्रीभवनाची किया लवकर घडुन यते. व सांद्रवन पुर्ण झाल्यावर पाऊस पडण्यास सुरुवात होते. "हवामान शास्त्रज्ञांच्या मते वनांच्या सिमेजवळ व वनांच्या आतल्या भागात पडणाऱ्या पावसाचे प्रमाण हे बाहेरच्या भागात पडणाऱ्या पावसापेक्षा 25 टक्के पर्यंत जास्त असू शकते"[9] कारण वनाच्छादीत प्रदेशात ढगाच्या प्रवाहाची उंची जास्त सांद्रवनक्षम पातळीकडे वाढते व त्यामुळे उघडया भुभागापेक्षा वनच्छादीत प्रदेशात जास्त पाऊस पडतो.

2. **भुजल पातळीत वाढ :** वनांच्या प्रदेशात पावसाचे पाणी झाडांचे बूंदे, गवत व पाला पाचोळा यांनी अडले जाते व त्यातील बरेचसे पाणी जमीनीत मुरते व काही पाणी वाहून जाते जमीनीत मुरलेल्या पावसामुळे भुजल पातळीत वाढ होते त्यामुळे पाण्याची उपलब्धता वाढुन विहीरी व नलिका कूप यांना सहज व अल्प खर्चात मोठया प्रमाणावर पाणी उपलब्ध होते.

3. **प्रदूषण नियंत्रन :** वनस्पतीचा प्रदूषण नियंत्रणातील सहभाग अतिशय महत्वाचा आहे. वनस्पतीमुळे प्रदूषण निर्माण करणाऱ्या घटकावर नियंत्रन राहते वनस्पती सुर्यप्रकाशात कार्बनडाय ऑक्साईड वायू शोषून घेतात व त्यावरील प्रक्रियेनंतर प्राणवायूच्या स्वरुपात ऑक्सिजन बाहेर सोडतात.म्हणजेच वनस्तीमुळे कार्बनडाय ऑक्साईड वायू शोषला जाऊन हवा प्रदूषण नियंत्रित होते. म्हणून हवा प्रदूषण टाळण्यासाठी वनस्पती अतिशय महत्वाच्या आहेत. तसेच अन्ननिर्मिती, पृथ्वीचे तापमान नियंत्रित करण्यासाठी, पर्यावरणाच्या संतुलनासाठी, औषध निर्मितीसाठी, अवर्षणाचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी, जमीनीची धूप कमी करण्यासाठी, शेती व्यवसायासाठी अशा अनेक कारणांसाठी वनसंपदा अत्यंत महत्वाची आहे. म्हणून वनसंपदेला पर्यावरण संतुलनात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. वनसंपदेच्या संवर्धनामुळे पर्यावरण अबाधीत राहते व पर्यायाने मानवाच्या ते कल्यानाचेच ठरते.

**समारोप :**

वनसंपदेचा उपयोग पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी फारच महत्वाचा आहे वनसंपदे शिवाय पर्यावरणात समतोल राखणे जवळ जवळ अशक्य आहे. अलिकडच्या तीन चार दशकात संपुर्ण जगात मानवाच्या अनिर्बंध वनतोडीमुळे पर्यावरणाचे सुंलन ढासाळलेले आहे. वृक्ष तोडीमुळे किंवा वन तोडीमुळे पृथ्वीच्या सरासरी तापमानात वाढ, कार्बनडाय ऑक्साईचे वाढते प्रमाण, मृदाधूप, दुष्काळ,पूर, वन्य पशूपक्षांचा ऱ्हास, ओझोन वायूचा ऱ्हास, वाळवंटीकरण, भुजल पातळीत घट, पर्यावरण संतुलनात बिघाड, पर्जण्यात घट, मानवी आरोग्यात बिघाड या सारख्या पर्यावरणीय समस्या गंभीर स्वरुपात निर्माण झाल्या आहेत. या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी वनाचे आच्छादन वाढविणे आवश्यक आहे व वनसंवर्धन करणे गरजेचे आहे.

मानव हा पर्यावरणाचा अविभाज्य घटक असल्याने पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व संतुलनाची नैतिक जबाबदारी मानवावरच आहे. म्हणून पर्यावरणातील साधनसंपदाचे संवर्धन, व्यवस्थापन व नियोजनात्मक मानवी हिताच्या दृष्टीने शास्त्रीय अभ्यास करणे गरजेचे आहे. तरच पर्यावरण संतुलीत राहू शकते. वनसंपदा हा पर्यावरण संतुलनातील अविभाज्य घटक आहे व वनसंपदेचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

पर्यावरणाचा एकुण तोल सांभाळणारा निसर्गातला हा अनमोल ठेवा म्हणजे वनसंपदा जतन करणे मानवाचे आध्यकर्तव्य आहे. तसेच वनसंवर्धनाबद्दल लोक चळवळ तीव्र व्हायली हवी. तरच वन संवर्धनाचे ध्येय गाठणे शक्य होईल.

**संदर्भ ग्रंथसुची:**

1. डॉ.दयानंद उजळंबे– निसर्गबंध अरुणा प्रकाशन, लातुर. प्रथमावृत्ती 2012 पृ.क.35
2. डॉ.वराट व प्रा.बोराडे– पर्यावरण भूगोल, विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगपुरा, औरंगाबाद. प्रथमावृत्ती ऑगष्ट 2012 पृ.क.06
3. डॉ.वराट व प्रा.बोराडे– पर्यावरण भूगोल, विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगपुरा, औरंगाबाद. प्रथमावृत्ती ऑगष्ट 2012 पृ.क.08
4. डॉ.वराट व प्रा.बोराडे– पर्यावरण भूगोल, विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगपुरा, औरंगाबाद. प्रथमावृत्ती ऑगष्ट 2012 पृ.क.01
5. डॉ.वराट व प्रा.बोराडे– पर्यावरण भूगोल, विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगपुरा, औरंगाबाद. प्रथमावृत्ती ऑगष्ट 2012 पृ.क.57
6. प्रा आशा भराडीया (राठी)– पर्यावरण शिक्षण,अरुणा प्रकाशन, लातुर. प्रथमावृत्ती – 2010 पृ.क.176
7. डॉ.संदिपान जाधव व डॉ.ओमप्रकाश शहापुरकर व इतर – मानवी भूगोल, अरुणा प्रकाशन, लातुर. प्रथमावृत्ती नोव्हेंबर 2009 पृ.क.74
8. डॉ.वराट व प्रा.बोराडे– पर्यावरण भूगोल, विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगपुरा, औरंगाबाद. प्रथमावृत्ती ऑगष्ट 2012 पृ.क.57
9. डॉ.वराट व प्रा.बोराडे– पर्यावरण भूगोल, विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगपुरा, औरंगाबाद. प्रथमावृत्ती ऑगष्ट 2012 पृ.क.58

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | वस्तु व सेवा कर (जी.एस.टी.)<br>**प्रा. डॉ. अवथरे जयेश मो.** | ५४-५८ |
| १३ | ऐतिहासिक यशस्वी महिला<br>**प्रा. जगदाळे किरण आगतराव** | ५९-६३ |
| १४ | साहित्य आणि पत्रकारीतेमध्ये भाषेचे स्थान<br>**प्रा. डॉ. विनायक तुकाराम टाळकुटे** | ६४-६७ |
| १५ | महिला सबलीकरण आणि अर्थसंकल्प<br>**डॉ. प्रा. व्हि. एम. घुबळे** | ६८-७१ |
| १६ | भारतीय व्यवस्थेपूढील आव्हाने<br>**प्रा. डॉ. अवथरे जयेश मो.** | ७२-७६ |
| १७ | मराठी ग्रामीण कादंबरीतील दलित जाणिवांचे चित्रण<br>**डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी** | ७७-८० |
| १८ | स्वतंत्र भारतात लोकशाही : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार<br>**Prof. Dr. Mukunda Gopalrao Meshram** | ८१-८५ |
| १९ | आंबेडकरवादी समीक्षा : स्वरुप व विवेचन<br>**डॉ. इंद्रजीत ओरके** | ८६-९३ |
| २० | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मजूरमंत्री म्हणून केलेल्या कार्याचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर** | ९४-९७ |
| २१ | कश्मीरी संगीत का इतिहास और संगीतकार-शासक<br>**इकबाल हुसैन मीर** | ९८-१०१ |
| २२ | लोकतांत्रिक विकेन्द्रीकरण से बदलती गाँवों की तस्वीर (कोडरमा जिले के संदभ्र में)<br>**प्रियंका कुमारी** | १०२-१०८ |
| २३ | शिक्षा के क्षेत्र में महिलाओं की भूमिका<br>**सौ. रुपाली अमित अग्रवाल** | १०९-११० |
| २४ | शिवकालीन मजलीसची कार्यपद्धती<br>**प्रा. हरीदास मंगरु वाकुलकर** | १११-११५ |



Scanned with CamScanner

# १४. साहित्य आणि पत्रकारीतेमध्ये भाषेचे स्थान

**प्रा. डॉ. विनायक तुकाराम टाळकुटे**
मराठी विभाग, श्री शरदचंद्रजी पवार परिष्ठ महाविद्यालय, नारंगवाडी ता. उमरगा जि. उस्मानाबाद.

'भाषा' हा शब्द 'भाष' या धातुपासून तयार झालेला आहे. 'भाष' म्हणजे बोलणे, आदिमानव सुरुवातीच्या अवस्थेमध्ये जंगलामध्ये राहु लागला. आपल्या उदरनिर्वाहासाठी फळे–कंदमुळे खाऊन आपली उपजीवीका भागवू लागला आणि शरीर संरक्षणासाठी वृक्षांच्या पांनाचा वापर करु लागला. निवाऱ्यासाठी जंगलातील गुहेंचा वापर करु लागला. अशा प्रकारे मानवाने आपल्या अन्न, वस्त्र व निवारा या तिन्ही मुलभूत गरजांची पुर्तता करुन घेतली. दिवसापाठोपाठ दिवस मानव निसर्ग सानिध्यात, जीवन जगू लागला. मानवाने तिन्ही गरजा मिळवल्यानंतर त्याला चौथी आणि महत्त्वाची गरज भासू लागली ती विचारविनिमयाची एकापेक्षा अनेक मानव जेंव्हा एकत्र राहू लागले तेंव्हा त्यांना आपल्या मनातील भाव–भावना इतरांना कळवाव्यात असे वाटू लागले त्यामुळे मानवाने सुरुवातीला हावभावांच्या भाषेचा वापर केला. हातवारे करुन, डोळे मिचकावून किंवा इतर अंगीक हावभावाच्या माध्यमातून मानव संवाद सादु लागला. कालांतराने ध्वनीची भाषा, चिन्हाची भाषा चित्राची भाषा, असा भाषेचा विकास होत जाऊन मानवाने आज प्रगत बोली भाषेवर आपले स्थान पक्के केले आहे.

'भाषा' ही मानवाला मिळालेली एक नैसर्गिक देणगी आहे भाषेमुळेच मानव इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरलेला आहे. मानवाकडे विचार करण्याची क्षमता असल्यामुळे आपल्याला अवगत असलेल्या भाषेच्या माध्यमातून मानव विचार करतो अर्थात भाषा हे विचार करण्याचे माध्यम आहे भाषेला ईश्वरीय देण असेही म्हटले आहे. या संदर्भात संत तुकाराम महाराज म्हणतात, ''आपुलिया बळें नाही मी बोलत सख्खा कृपावंत वाचा त्याची''[१] आपणास जी बोली भाषा प्राप्त झाली त्यांचे संपुर्ण श्रेय तुकाराम महाराजांनी परमेश्वराला अर्पण केलेले आहे.

मानव आज एकमेकांशी जो संपर्क साधतो तो भाषेच्या माध्यमातूनच याच भाषेच्या सहाय्याने मानव स्वतःच्या मनातील विविध भावभावना, सुख–दुःख, अनुभव, विचार यांची देवाण–घेवाण करतो आहे. जगाच्या पाठीवर आज असंख्य मानवी समुह आहेत. प्रत्येक मानवी समुहांची त्यांची म्हणून एक स्वतंत्र भाषा आहे. भाषेशिवाय मानवी समुह नाही आणि मानवी समुहाशिवाय भाषाही निर्माण होऊ शकत नाही. समाजातील प्रत्येक मानवाला भाषाही येतेच.''ज्या माणसाला भाषा येत नाही तो एक तर अपंग –म्हणजे मेंदुत व श्रवणयंत्रात दोष असणारा असतो किंवा तो मानवी समुहात न राहणारा असू शकतो.''[२]

### साहित्यातील भाषेचे स्थान

साहित्याचा अर्थ विविध विविध सामुग्री असा असला तरी साहित्य हा शब्द मात्र एकच विशिष्ट अर्थ सांगतो, तो म्हणजे लेखन किंवा वाङ्मय जे जे बोलले जाते म्हणजे जे जे वर्णीमय ते ते वाङ्मय तसेच जे



Scanned with CamScanner

जे लिखित तेते साहित्य मराठी साहित्यामध्ये वेगवेगळे साहित्य प्रकार आहेत त्यात प्रामुख्याने कथा, कविता, कादंबरी, ललित, प्रवासवर्णन, नाटक, इत्यादी. अशा या वेगवेगळया साहित्य प्रकारातूनही अनेक वाङमय प्रवाह उदयास आले त्यात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, जनवादी साहित्य, लोकसाहित्य, स्त्रीवादी साहित्य इत्यादी.

प्रतिभासंपन्न साहित्यीकच साहित्य निर्माण करु शकतो. लेखक किंवा साहित्यीक लहाणपणापासून समाजात वाढलेला असतो. समाजातील विविध बदल तो अनुभवतो आणि स्वत:ला आलेले सामाजिक अनुभव तो कथा, कविता, कादंबरीच्या माध्यमातून तो साहित्यातून शब्दबध्द करतो अर्थात समाजाचे विविध पडसाद हे साहित्यातून उमटले जातात. म्हणून साहित्याला 'मानवी जीवनाचा आरसा म्हटलेले आहे' विविध जाती–धर्मांनी नटलेल्या भारतीय समाजव्यवस्थेत अनेक जातींची लोक राहतात. त्यांच्या वेगवेगळया जातीवरुन त्यांची प्रत्येकांची एक स्वतंत्र बोली तयार झालेली आहे. स्वत:ची मातृभाषाच प्रत्येकाला जवळची आणि आपुलकी जिव्हाळयाची वाटते आपल्या स्वत:च्या भाषेबद्दल प्रत्येकाला अभिमान वाटतो आणि आपल्या भाषेची ओळख जगभर व्हावी, जगातील विविध ठिकाणी आपली भाषा पोहंचवावी या जिज्ञासेपोटी वेगवेगळया प्रदेशातील ग्रामीण साहित्यीक, आदिवासी साहित्यीक, दलित साहित्यीक, फासेपारधी समाजातील त्याचबरोबर विविध भटक्या समाजातील लेखकांनी आपल्या भाषेची ओळख कथा, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्राच्या माध्यमातून समाजाला करून दिलेली आहे. विविध प्रकारच्या बोली भाषा साहित्यातून आज शब्दबध्द केलेल्या दिसून येत आहेत. ''कोणत्याही भाषेच्या उत्पत्तीचा विचार करताना ती भाषा ज्या समाजाची भाषा असते त्या समाजाचा विचार करावा लागतो.''[३]

बंजारा समाजाची भाषा ही एक त्यांच्यापुरतीच मर्यादित प्रमाणात वापरली जाणारी भाषा आहे. या भाषेला लिपी नाही अर्थात ही लिखीत नसून बोली भाषा आहे. असे असले तरी आज अनेक बंजारा गीते ही मराठीतुनच लिहिलेली आहेत. म्हणून या साहित्यालाही एक वेगळे स्थान मिळालेले दिसत आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात राहणाऱ्या अदिवासी जमाती आहेत आणि त्यांच्या बोलीतून साहित्य निर्माण झालेले आहे. देवदत्त पाटील यांची 'व्याध' ही कादंबरी फासेपारधी समाजाचे वर्णन करणारी आहे अशा विविध प्रकारच्या साहित्यातून भाषा प्रकट होताना दिसते.

**पत्रकरितेमध्ये भाषेचे स्थान**

मानवाच्या भावना व विचार व्यक्त करण्याच्या गरजेतून भाषेचा उगम झालेला आहे. आज भाषा ही मानवाची मुलभूत गरज बनलेली आहे. आपले विचार मानव दुसऱ्याला दूरपर्यंत पोहंचवण्यासाठी पत्रलेखन करु लागला. पत्रलेखन करणे ही माणसाची फार जुनी पध्दत आहे. ''खऱ्या अर्थाने मानवी भावनांना व विचारांना उद्‌गार देणारे पत्र हे साधन आहे. माणूस एकाच वेळेला सामाजिक आणि व्यक्तीगत स्वरुपाचे आयुष्य जगत असतो.''[४] त्याचबरोबर जाहिरात करणे, बातमी देणे या गोष्टी पत्रकारीतेत येतात. अशा या पत्रकरितेमध्ये भाषेचे स्थान महत्वाचे आहे. पत्रकारीता हे समाजातील प्राचीन काळापासून चालत आलेले आणि प्रभावी प्रसारमाध्यम आहे. याचा वापर सुज्ञ व सुशिक्षित समाजासाठीच होतो. ज्याप्रमाणे रेडीओ, दूरदर्शन ही



Scanned with CamScanner

प्रसारमाध्यमे अशिक्षितांच्या उपयोगी पडणारी आहेत. तशी पत्रकारीता हे प्रसार माध्यम समाजातील अडाणी लोकांच्या उपयोगी पडणारे नाही. त्याचबरोबर पत्रकारीतेसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड, तेलगू या भाषांचाही समावेश होतो त्यांच्या राज्यातील मातृभाषेतून पत्रकारीतेचे कार्य चालू असते.

पत्रकारितेचा मुख्य घटक म्हणजे बातमी होय. एखादी घटना घडलेली असताना ती जनसमुहापर्यंत एका बातमीच्या रुपाने पोहंचविली जाते. सहा 'क' कारांच्या उत्तराशिवाय कोणतीही बातमी पुर्ण होत नाही. ते सहा 'क' कार म्हणजे एखादी घटना घडली असेल तर ती का घडली? कोठे घडली? केंव्हा घडली, कशी घडली, कोणी घडवली, कोणाकडुन घडली ही सहा 'क' कारांचे पुर्ण उत्तर मिळवणे म्हणजे बातमी पुर्ण मिळवणे होय. बातमीचा मुख्य गुणधर्म म्हणजे नाविन्यता होय. कोणतीही घटना नविन किंवा वेगळी असेल तरच ती बातमी होऊ शकते. या बरोबरच सर्वोत्तम बातमी लेखनासाठी लेखन कौशल्यही प्रभावीच असावे लागते. म्हणूनच वर्तमानपत्रांच्या संपादकांना व वार्ताहरांना उत्तम भाषेची जान आसणे आवश्यक आहे. यावरच बातमीची यशस्विता अवलंबून असते. वर्तमानपत्रातील बातमी लेखनाचे कौशल्य समजून घेण्यासाठी पुढील उद्दिष्टे महत्वाची मानली गेलेले आहेत.

**उदिदष्टे**

१. वृत्तपत्रीय भाषेचा लोकमनावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.
२. वृत्तपत्रातील बातमी अधिक प्रभावीपणे मांडण्याचे कौशल्य लक्षात घेऊन वृत्तपत्रीय लेखनाचे विशेष समजून घेणे.
३. नव्या सामाजिक बदलांचा वृत्तपत्रातील भाषेवंर कोणता परिणाम झाला हे जाणून घेणे.
४. वर्तमानपत्रातील भाषेचे महत्व समजून घेऊन सामर्थशतकांचा शोध घेणे.
५. व्यवहार भाषा, ग्रंथभाषा व वर्तमानपत्रातील भाषा यातील फरक स्पष्ट करणे.

वर्तमानपत्राची भाषा ही परिस्थितीनुसार बदलते. युध्दजन्य परिस्थितीमध्ये ही भाषा विद्रोही स्वरुप धारण करते. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी ही भाषा भावनिक बनते तर कधी संवेदनशील बनते. निवडणुकांच्या काळातील राजकीय बातमी देताना ही भाषा एकमेकांची लक्तरे काढणारी असते. अर्थसंकल्पीय चर्चा, कायदेविषयक धोरणे ठरवताना, नवे नियम लागु करताना ती वस्तुनिष्ठ बनते. स्तंभलेख, अग्रलेखामधून ही भाषा परखड होते. म्हणून वर्तमानपत्रातील भाषा ही विषयानुरुप बदलताना जाणवते. या भाषेसंदर्भात प्रा. रामानंद व्यवहारे लिहितत, "भाषा ही हे आत्मनिवेदनाचे सर्वश्रेष्ठ प्रभावी आणि उपयुक्त साधन आहे. वृत्तपत्र माध्यम भाषेवरच अवलंबुन आहे. आपले कार्य आणि उद्दिष्टे ते भाषेशिवाय पूर्ण करु शकत नाही."[१]

आजच्या काळातील वर्तमानपत्रांचा विचार करता लोकमत, पुण्यनगरी, सकाळ यांची भाषी ही महाराष्ट्र टाईम्स व लोकसत्तापेक्षा वेगळी आहे. संध्यानंद, सामना, पुढारी या वर्तमानपत्राची भाषा ही इतर वृत्तपत्रांच्या भाषेच्या तुलनेत परखड असल्याने दिसते. दै. सम्राट, बहुजन क्रांती यांची भाषा ही विद्रोही आहे मुंबई चौफेर, पोलीस टाईम्स या वृत्तपत्राची भाषा स्फोटक दिसते. स्थळ, काळ व परिस्थितीपेक्षा वृत्तपत्रांची भाषा बदलताना दिसते.



Scanned with CamScanner

एकंदरीत साहित्य आणि पत्रकारीतेमध्ये भाषेचे स्थान अनन्यसाधारण आहे वेगवेगळया साहित्य प्रकारानुसार भाषेचे स्वरुप हे बदलत जाते. त्याचबरोबर वेगवेगळया वर्तमानपत्र व घटना प्रसंगानुसारही भाषा वेगवेगळे स्वरुप धारण करतांना दिसुन येते. असे असले तरी एक मात्र महत्वाचे आहे की, वर्तमानपत्र व साहित्यातूनही लेखन करणारा साहित्यीक व वार्ताहार हा चौफेर असायला हवा, कोणतीही बातमी सहजपणे मांडण्याचे सामर्थ्य त्याला अवगत असावे लागते. पत्रकार हा जेवढा भाषेचा उत्तम जाणकार असेल तेवढया मोठया प्रमाणात वर्तमानपत्र गुणवत्तापूर्ण निघू शकते. म्हणून भाषा निपुत असणे हे वार्ताहार व साहित्यीकाचे महत्त्वाचे भुषण आहे.

**संदर्भग्रंथ**

१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, प्र. न. जोशी, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, पृष्ठ. १६०
२. आधुनिक भाषा विज्ञान आणि मराठी भाषा, डॉ. दादा गोरे, आवृत्ती तिसरी जुलै २००७, पृष्ठ. ११
३. तत्रैव – पृष्ठ. १६२
४. उपयोजित मराठी भाग – १, प्रा. कल्पना जाधव, पृष्ठ. ६५
५. संपा. डॉ. साहेब खंदारे, व्यावहारिक मराठी भाग–२, निर्मल प्रकाशन नांदेड, प्रथमावृत्ती २००३, पृष्ठ ७८




Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-IX, Issue-II
April - June - 2019
Marathi
Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Impact Factor – 6.261 | Special Issue - 180 | April 2019 | ISSN – 2348-7143
UGC Approved Journal List No. 40705

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

# SOCIAL AND SCIENCE INNOVATION

- EXECUTIVE EDITOR OF THE ISSUE -
Dinesh R. Jaronde

- CHIEF EDITOR -
Dr. Dhanraj T. Dhangar

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

For Details Visit To : www.researchjourney.net

Scanned with CamScanner

21. Isolation, Characterizations, Identification of Bacteriocin Producing Lactic Acid Bacteria (LAB) and its Biopreservative Potential.......... 60
Shertate Rubina A.Sattar
22. Medicinal Property of Ayurvedic Herbs.......... 63
Dr.Pradnya B.Gurde (Jamdhade), Dr. Subhash B. Jamdhade
23. Priliminary Phytochemical Analysis of Cajanus cajan (Red gram) and Glycine max (Soybean). ........ 66
Tiple Neha Ramesh[1] and Dr. Dakhane Vimal P[2]
24. Analysis of Soluble Protein and Free Amino Acid Content of Leaf Extracts (LE) and Leaf Protein Concentrates (LPC) of Green Foliages of Some Plants. .......... 68
V. G. Manwatkar
25. Bioremediation of Textile Dye Amond H5g By Escherichia Sp. Ahg-4.......... 71
Amarja Harishchandra Bhosale
26. Morphological diversity and proximate analysis of the different variants of the Lagenaria siceraria (Mol.) Standl from Amravati region. .......... 75
Swati Dadarao Yeotkar
27. Phytoremediation of Heavy Metal Ions and Contaminants Through *Brassica Napus* Var. *Excel* Species ... 79
N. S. Shirbhate
28. A Study of Real-time Facial Detection, Recognition and Tracking System using Raspberry Pi 3B...... 84
Nguyen Anh Tuan
Sam Vu Thang
29. Literature Review of recent Innovation in Garbhasanskara through Ayurveda .......... 90
Vd. Priti Ghansham Makade

## मराठी

३०. भारतीय संविधान आणि महिलांचे हक्क.......... ९२
डॉ. रमेश राठोड
३१. महिला व राजकारण .......... ९४
प्रा. लक्ष्मण एफ. शिराळे
३२. खरीप पिकांच्या उत्पादनावर घटत्या पर्जन्याचा परिणाम–यवतमाळ जिल्हा.......... ९६
यशवंत प्रयाग राठोड
३३. धर्मांतरीत बौद्धांचा आर्थिक विकासाच्या संदर्भात सरकारची भूमिका .......... ९८
प्रा. किशोर जगन्नाथ शेन्डे
३४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य.......... ९९
प्रा. डॉ. निलेश एकनाथराव लोंढे
३५. बोली भूगोल : संकल्पना व स्वरूप .......... १०२
प्रा. मोहन बाबुराव चव्हाण
३६. आदर्श समाजसेविका रमाबाई रानडे–एक दृष्टीक्षेप .......... १०५
प्रा. डॉ. जगदिश दयासागर हेंडवे
३७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार आणि भारतीय अर्थव्यवस्था .......... १०८
प्रा. रमेश तारकराम खंडागळे
३८. जीवनमूल्याधिष्ठित नायिका पार्वती (महाकवी कालिदासाच्या कुमारसंभव महाकाव्याच्या संदर्भात) .......... ११२
डॉ. कर्वे पल्लवी विजय
३९. पक्षी पाणपोई : जैवविविधता संवर्धन.......... ११५
डॉ. धर्मेंद्र तेलगोटे
४०. महाराष्ट्रातील आदिवासी माना जमातीचे स्वरूप व वैशिष्टये .......... ११९
एम. के. नन्नावरे
४१. वाङ्मय निर्मिती प्रक्रिया .......... १२२
प्रा. डॉ. विनायक तुकाराम टाळकुटे



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143 April 2019 RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 180 : Social and Science Innovation

# वाङ्मय निर्मिती प्रक्रिया

प्रा. डॉ. विनायक तुकाराम टाळकुटे
मराठी विभाग
श्री. शरदचंद्रजी पवार वरिष्ठ महाविद्यालय, नारंगवाडी, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद.

सर्वसाधारणपणे जे जे वर्णिमय ते ते 'वाङ्मय' अशी वाङ्मय या शब्दाची व्याख्या केली जाते. उदा. मराठी वाङ्मय, हिंदी वाङ्मय, इंग्रजी वाङ्मय, कन्नड वाङ्मय, उर्दु वाङ्मय इत्यादी. या सर्व वाङ्मयाची एक भाषा व लिपी आहे. ही वाङ्मय बोलली व लिहिली जातात. वाङ्मय म्हणजे साहित्य असेही म्हणता येते. साहित्याला इंग्रजीमध्ये 'Literature' या नावाने ओळखले जाते. आता साहित्य म्हणजे काय ? असाही प्रश्न निर्माण होतो. साहित्याचा अर्थ विविध विविध सामुग्री असा असला तरी साहित्य हा शब्द मात्र एकच विशिष्ट अर्थ सांगतो, तो म्हणजे लेखन.

जगातील अनेक गुढांपैकी ललित वाङ्मयाची निर्मिती कशी होते. हे सुध्दा एक गुढच आहे. हजारो वर्षापासुन मनुष्य या गुढाचा शोध घेत आलेला आहे. आणि यापुढेही घेत राहणार आहे. एक गोष्ट मात्र सर्वमान्य आहे ती म्हणजे ललित वाङ्मय निर्माण करण्यासाठी कांही विशिष्ट प्रक्रिया घडावी लागते. ही प्रक्रिया घडण्यासाठी कांही विशिष्ट नैसर्गिक गोष्टी मानवांमध्ये असाव्या लागतात त्या गोष्टी म्हणजे

१) सुक्ष्म निरिक्षण शक्ती.
२) तीव्र स्वरूपाची स्मरणशक्ती
३) तरल स्वरूपाची संवेदनशक्ती/संवेदना
४) औचित्यशक्ती
५) शब्दाची निवडशक्ती
६) लौकीक जीवनातील घटनांचे नवे अन्वयार्थ लावण्याची शक्ती
७) चिंतनशीलता
८) प्रत्यक्षात भेदलेल्या किंवा कल्पनेच्या पातळीवर अनुभवलेल्या लौकिक जीवनातील अनुभवांचे सामान्यीकरण करण्याची क्षमता
९) शब्दांची व्यंजनाशक्ती वापरण्याची क्षमता.

वरील सर्व शक्ती कल्पनाशक्तीच्या जोडीने ललित लेखकांच्या अंगी असाव्या लागतात.

**प्रतिभा :**

'प्रतिभा' ही काव्यनिर्मितीची प्रमुख शक्ती आहे. सर्वच मनुष्यांना ही शक्ती प्राप्त होत नाही. ही एक नैसर्गिक दैवीशक्ती आहे. ज्यांना हि शक्ती प्राप्त झाली तोच साहित्यनिर्मिती करू शकतो. संस्कृत साहित्यशास्त्रात ज्या नैसर्गिक शक्तीला प्रतिभा शक्ती म्हणून ओळखतात तीच शक्ती इंग्रजीमध्ये Imagination म्हणून परिचित आहे. आधुनिक मराठी साहित्य समिक्षक या प्रतिभा शक्तीला आणखी एका पर्यायी नांवाने ओळखतात. हे पर्यायी नांवे म्हणजे 'कल्पनाशक्ती' होय. ही नैसर्गिक शक्ती तीन नांवाने परिचित आहे.

१) प्रतिभाशक्ती
२) कल्पनाशक्ती
३) Imagination

नांवे जरी वेगवेगळी वाटत असली तरी त्यातून काव्यनिर्मितीला प्रवृत्त करणारी नैसर्गिक शक्ती हाच एकमेव अर्थ सुचित होतो. जगातील अनेक विद्वानांनी याच प्रतिभा शक्तीला काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेत किंवा ललित वाङ्मयाच्या निर्मिती प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान दिले आहे. प्रतिभाशक्तीशिवाय काव्यनिर्मिती करणे शक्य नाही. प्रतिभाशक्ती नसताना जर कुणी ललित वाङ्मयाच्या निर्मितीची खटपट केली किंवा ललित वाङ्मय निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर ते ललित वाङ्मय निश्चितच उपहासाला किंवा टीकेला पात्र ठरते. संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या प्रकारे प्रतिभेचे हे महत्त्व ओळखुन तिच्या कार्याची महती गायली आहे. भट्टताताने प्रतिभेची व्याख्या केलेली आहे.

"प्रतिभा नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा"[१] म्हणजे प्रतिभा अशी शक्ती आहे की, जिच्यामुळे साध्याच नित्याच्या वस्तुच्या ठिकाणी नवे अर्थ प्रतिभावंताला दिसू लागतात. प्रसिध्द संस्कृत साहित्यशास्त्रज्ञ अभिनवगुप्ताने सुध्दा प्रतिभेविषयी अत्यंत मुलगामी विचार मांडला आहे. वाङ्मय निर्मितीच्या प्रक्रियेत प्रतिभेचे किती महत्त्वाचे स्थान असते आणि प्रतिभेचे काय कार्ये असते याचे उत्तम विवेचन अभिनवगुप्ताने केले आहे. तो म्हणतो, "अपूर्ववस्तू निर्माण क्षम"[२]

अभिनवगुप्ताने प्रतिभेच्या कार्याचे अत्यंत नेमक्या व अर्थपूर्ण शब्दांत वर्णन केले आहे. साध्या वस्तूला पाहून जिच्यामुळे वेगवेगळ्या कल्पना सुचतात आणि या कल्पना सुचल्यामुळेच अपूर्व स्वरूपाची वाङ्मयनिर्मिती करणे शक्य होते. म्हणून या नैसर्गिक शक्तीला कल्पनाशक्ती म्हणायचे असे अभिनवगुप्त म्हणतो.

**व्यक्तिसापेक्ष प्रतिभा :**

व्यक्तीसापेक्षता हा साहित्याचा एक महत्त्वाचा गुणधर्म आहे. साहित्य हे व्यक्तिनिष्ठ आहे म्हणजेच प्रतिभा ही व्यक्तीसापेक्ष आहे. साहित्यामध्ये एखादी कथा, कविता, कादंबरी लेखकाने ती अपूर्ण ठेवलेली असेल तर दुसरा साहित्यीक ती वाङ्मयकृती पूर्ण करू शकत नाही. कारण जो दृष्टिकोन त्या लेखकाचा आहे तिच दृष्टी पुढच्या लेखकाची असणार नाही म्हणून एखादयाची प्रतिभा ही दुसऱ्याची असुच शकत नाही. साहित्याचा आस्वाद घेत असताना आस्वादकाकडे देखील प्रतिभा असावी लागतेच. ज्याच्याकडे ही नैसर्गिक शक्ती नाही तो साहित्याचा आस्वाद घेऊ शकणार नाही आणि जो साहित्याचा आस्वाद घेणार नाही तो साहित्यही निर्माण करू शकणार नाही. उच्च कोटीची प्रतिभाशक्ती ही आस्वादक व समिक्षकाकडे असावी लागते.



Scanned with CamScanner

बालकवींची 'फुलराणी' बालकवीला जशी भावली तशी दुसऱ्याला भावेलच असे नाही. म्हणून प्रतिभा ही व्यक्तीसापेक्ष आहे. लेखकाची दृष्टी ही तेज असावी लागते. प्रतिभाशक्तीच्या सहाय्याने लेखक निर्जीव वस्तू सजीव करतो, अदृष्य वस्तू देखील तो प्रतिभाशक्तीच्या माध्यमातून पाहू शकतो. म्हणून कविबद्दल असेही म्हटले जाते, 'जे न पाहे रवि, ते पाहे कवी' म्हणजेच या सृष्टीतील जो घटक सुर्याला दिसत नाही तो प्रतिभावान कविला दिसतो.

**स्फुर्ती :**

कोणताही ललित लेखक जेंव्हा वाङ्मयनिर्मिती करीत असतो तेंव्हा त्याची सुक्ष्म निरिक्षणशक्ती, स्मरणशक्ती, संवेदनशिलता, औचित्यशक्ती, शब्दनिवडशक्ती, चिंतनशिलता, सामान्यीककरण क्षमता या सर्व शक्ती कार्यान्वित झालेल्या असतात. पण यामुळे साहित्य किंवा वाङ्मयनिर्मिती होईल असे म्हणता येणार नाही. सर्व अनुभव जरी मनामध्ये उभा राहत असला, मनातल्या मनात तो अनुभव शब्दरूपही घेत असला तरी लेखकाच्या मनात येईल तेंव्हा किंवा लेखकाला मर्जी होईल तेंव्हा सोय आणि सवड पाहून लेखक लिहू शकत नाही. त्याच्या मनात वाङ्मयनिर्मितीचे सर्व रसायन तयार झाल्यानंतरही त्याला प्रत्यक्ष लेखन करण्याची उत्कट इच्छा होण्याची वाट बघत बसावी लागते. वाङ्मयनिर्मितीची ही तीव्र, अटळ इच्छा म्हणजेच स्फुर्ती होय. अशी स्फुर्ती आल्याशिवाय कितीही मोठा प्रतिभावंत असला तरी त्याला वाङ्मयनिर्मिती करणे कदापीही शक्य नाही. स्फुर्ती येण्याची वाट त्याला बघावीच लागते. स्फुर्ती येण्यासाठी त्याला स्फुर्तीची आराधना करावीच लागते. मनात सर्व रसायन तयार झाल्यानंतर सुध्दा क्वचित कांही वर्ष सुध्दा स्फुर्तीची आराधना लेखकाला करावी लागते आणि असेही घडू शकते की, वाङ्मयनिर्मितीचे सर्व रसायन मनात तयार झाले आणि लगेच वाङ्मय निर्मितीही झाली. कारण लगेच स्फुर्ती आली असा स्फुर्तीचा आणि वाङ्मयनिर्मितीचा अगदी प्रत्यक्ष संबंध आहे. म्हणून वाङ्मयनिर्मितीच्या प्रक्रियेत स्फुर्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. असे असले तरी स्फुर्ती ही स्वतंत्र शक्ती मात्र नाही. स्फुर्तीचा अर्थ इतकाच की, प्रतिभावंताला वाङ्मयनिर्मितीची होणारी तिवृतम इच्छा. अर्थात हे उघडच आहे की, ज्याला मुळात प्रतिभाशक्तीच नाही त्याला कधीही वाङ्मयनिर्मितीची स्फुर्ती होणे शक्य नाही.

सारांश, सह्रदयी वाचक, समिक्षक अथवा लेखक या सर्वांना साहित्यास्वाद घेण्यासाठी किंवा साहित्यनिर्मिती करण्यासाठी प्रतिभेचे सहाय्य घ्यावेच लागते. प्रतिभासामर्थ्याच्या आधारावरच साहित्यीक साहित्याचा आस्वाद घेऊ शकतो किंवा साहित्य निर्माण करू शकतो. ज्याच्याकडे प्रतिभाच नाही अशांनी शब्दांची जुळवा-जुळव करून स्वार्थासाठी साहित्यनिर्मितीचा प्रयत्न केला तर ते साहित्य हास्यास्पद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून वाङ्मय निर्मितीची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सुक्ष्म निरिक्षणशक्ती, स्मरणशक्ती, संवेदनशिलता, औचित्यशक्ती, शब्दनिवडीची क्षमता, सामान्यीकरण या घटकांसह प्रतिभा व स्फुर्ती असावी लागते.

**संदर्भ ग्रंथसुची :**

१. डॉ. सदाशिव सरकटे, साहित्यशास्त्र, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, जुलै २००५, पृष्ठ. ६६
२. तत्रैव - पृष्ठ. ६६



Scanned with CamScanner

ISSN 2349-638x
Impact Factor 6.293

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL

Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No. 64

Executive Editor
Dr. S.M. Maner
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor
Dr. S.M.Deshmukh
Head, Dept. of Marathi
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Chief Editor
Prof. Pramod Tandale

Scanned with CamScanner

| Sr No | Author Name | Title of Article / Research Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 143 | प्रा. डॉ. गोपीनाथ पा. बोडखे | सुत्रसंचालनाचेस्वरूप आणि तंत्र | 396 |
| 144 | दुष्यंतआनंदराव शिंदे | सूत्रसंचालन: कला आणी व्यावसायिक संधी | 400 |
| 145 | प्रा. हनुमंत मते | सूत्रसंचालन: एक कला | 404 |
| 146 | प्रा. डॉ. रामा भिमराव रोकडे | वक्तृत्व : एक प्रयत्नसाध्य कला | 406 |
| 147 | प्रा. नावनाथ निव्रृती बेंडे | प्रसारमध्यामातील मुलाखत तंत्र एक भाषिक कौशल्य | 409 |
| 148 | शारदा किशन धामणगांवकर | मुलाखत तंत्र | 411 |
| 149 | श्री. श्रीकांत दत्तात्रय तनपुरे | मुलाखत : तंत्रस्वरूप आणि प्रक्रिया | 415 |
| 150 | प्रा. संजीवकुमारश्रीमंतराव माने | मुलाखत तंत्र | 417 |
| 151 | प्रा. विजय साहेबराव जाधव | मुलाखत तंत्र आकलन व विश्लेषण | 419 |
| 152 | प्रा.डॉ. सोमनाथ महादेव दडस | मुलाखत तंत्र | 421 |
| 153 | प्रा. डॉ हनुमंत तुकाराम माने | मुलाखत तंत्र आणि मंत्र | 424 |
| 154 | श्रीकांतपांडुरंगचौगुले | मुलाखत तंत्र | 426 |
| 155 | प्रा. डॉ. बालाजी खराबे | मुलाखत कौशल्ये | 431 |
| 156 | प्रा. डॉ. डी. के. आहेर | मुलाखत लेखन | 434 |
| 157 | प्रा. डॉ. केशव पाटील | मुलाखत : एक कला व तंत्र | 436 |
| 158 | प्रा. डॉ. विनायक तुकाराम टाळकुटे | प्रसारमाध्यमातील जाहिरातीचे महत्त्व | 439 |
| 159 | डॉ. दादासाहेब गिऱ्हे | जाहिरात क्षेत्र आणि भाषा | 441 |
| 160 | चंदाराणी गोरख कसपटे | जाहिरात आणि दुरदर्शन: मराठी भाषेतील रोजगाराच्या संधी | 443 |
| 161 | डॉ. जयदेवी पवार | जाहिरातीमधील भाषेचे महत्त्व | 445 |
| 162 | प्रा. बिभिषण देशमुख<br>प्राचार्य डॉ. हरिदास फेरे | जाहिरात लेखन | 449 |
| 163 | प्रा.डॉ. शिवाजी तुकाराम पाटिल | रोजगारभिमुख जाहिरात क्षेत्र | 453 |
| 164 | प्रा. लक्ष्मण व्यंकट बिराजदार | जाहिरात : स्वरुप, संकल्पना व लेखनापूर्वीचे उपयोजन | 456 |
| 165 | डॉ. शिवराज काचे | भाषा आणि जाहिरात (दूरदर्शन) | 459 |
| 166 | डॉ. व्हि.ए. गाजरे | वृत्तपत्र जाहिरात लेखन कौशल्ये | 462 |




Scanned with CamScanner

# प्रसारमाध्यमातील जाहिरातीचे महत्त्व

प्रा. डॉ. विनायक तुकाराम टाळकुटे
मराठी विभाग प्रमुख
श्री. शरदचंद्रजी पवार महाविद्यालय नारंगवाडी
ता. उमरगा जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना :-**

प्रसार माध्यमे आणि जाहिरात यांचा अतिशय जवळचा संबंध आहे सध्याचे युग हे जाहिरातीचे युग आहे. वाढत्या वैज्ञनिक युगामध्ये आपल्या कोणत्याही वस्तू अथवा पदार्थांच्या जाहिरातीसाठी प्रसार माध्यमे ही महत्त्वाची भूमिका बजावतात. प्रसार माध्यमातील जाहिरातीचे महत्त्व जाणून घेण्यासाठी भाषेच्या निर्मितीचा विचार महत्त्वाचा आहे. कारण भाषा निर्माण होतांना देखील समाजात भाषेचाही वेडा-वाकडा का असेना परंतू प्रसार आणि प्रसार झाला असावा लागेल अदिमानवाच्या सर्व प्राथमिक गरजा पूर्णझाल्यानंतर तो आपसातील विचारांच्या आदान-प्रदानासाठी भाषेचा उपयोग करू लागला. सुरूवातीस हवभावाची, चिन्हाची, चित्राची आणि नंतर बोली भाषा अस्तीत्वात आली आणि मानवाचा व्यवहार हा सुकर बनला. भाषेचे एक प्रगत रूप तयार होऊन भाषा परिपूर्ण बनत गेली.

जगामध्ये आज मराठी, हिंदी , इंग्रजी, तेलगू, कन्नड, फ्रेंच, रशियन, फारशी यासारख्या विविध भाषा अस्तीत्वात आल्या. प्रत्येक भाषा ही त्या त्या प्रदेश आणि प्रांतासाठी महत्त्वाची बनलेली आहे. तेथील समाज हा आपली स्वत:ती मातृभाषा म्हणून कोणती ना कोणती भाषा आत्मासात करीत असतो.व्यवहाराती एखादया गोष्टीची जाहिरात दोन प्रकारच्या प्रसार माध्यमातून होते. 1) मुद्रित प्रसार माध्यमे 2) इलेकट्रॉनिक प्रसारमाध्यमे आजचे युग हे संगणकाचे युग म्हणून गणले जाते म्हणून मुद्रित प्रसार माध्येमांपेक्षा जाहिरातीसाठी जास्तीत जास्त प्रमाणात इलेकट्रॉनिक प्रसार माध्यमांचा वापर हा जास्त वेगाने होतो आहे कमी वेळेत आणि कमी खर्च व श्रमामध्ये जास्तीत जास्त लोकांच्या पर्यंत मेडीया पोहंचताना दिसतो आहे

वास्तविक पाहता जाहिरातीचे स्वरूप हे काळानुरूप बदलत गेलेले आहे पूर्वी दवंडीच्यामाध्यमातून खेडयापाडयात जाहिरात केली जात होती. ही दवंडी देण्याची पध्दत देखील एक प्रकारची जाहिरात होय.'' जाहिरात कला ही पूर्वीपासून अस्तित्वात आहे. फक्त काळानुरूप तिचे स्वरूप बदलत गेले. पूर्वी ती दवंडीच्यास्वरूपात होती.''[1]

**जाहिरात म्हणजे काय ?**

जाहिरात या शब्दाला इंग्रजी भाषेमध्ये Advertisement असा शब्द वापरला जातो. वस्तू उत्पादक आणि ग्राहक यांना जोडणारे माध्यम म्हणजे जाहिरात होय. आपली वस्तू अथवा पदार्थ विकण्यासाठी लोकांपर्यंत माहिती, विचारअथवा संदेश पोहचविण्यासाठी जे माध्यम पैसे देऊन वापरले जाते त्यास जाहिरात असे म्हणता येते. अर्थात जाहिरातीमध्ये व्यक्तीला आकर्षित करण्याचा गुणधर्म असतो हे या ठिकाणी विशेषत्वाने सिध्द होते. अशा या जाहिरातीचे मुख्यत: तीन प्रकार पडतात.

1) **दृष्य अथवा दृक जाहिराती :** केवळ डोळयांनी पाहून अनुभवल्या जाणा-या जाहिरातींना दृक जाहिराती असे म्हणतात. उदा: वर्तमानकाळातील जाहिराती.

2) **श्राव्य जाहिराती :** ज्या जाहिराती केवळ कानांनी ऐकल्या जातात, अशा जाहिरातींना श्राव्य जाहिराती असे म्हणतात. उदा: आकाशवाणीवरील जाहिराती.

3) **दृक- श्राव्य जाहिराती :** ज्या जाहिराती डोळयांनी पाहण्याबरोबरच काणानीही ऐकल्या जातात त्या दृक- श्राव्य जाहिराती होय. उदा: दुरदर्शन वरील जहिराती.

अशा प्रकारे जाहिरातीचे मुख्य प्रकार मानले जातात. या माध्यमातून प्रत्यक्षपणे कोणत्या प्रसारमाध्यमामध्ये कशा प्रकारे जाहिरातीचा वापर केला जातो हे समजूण घेणे महत्त्वाचे आहे

**4)वृत्तपत्र माध्यमातील जाहिराती :** वृत्तपत हे अगदी सुरूवातीपासून चालणारे प्रसार माध्यम आहे. वृत्तपत्रामध्ये जाहिरात करताना वस्तूच्या विक्रीचे क्षेत्र लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. तसेच जाहिरातीची भाषा ओघवती, साधी-सरळ आणि सर्वांना समजणारी असावी आकर्षक जाहिरातीसाठी मुद्रणातील अनेक घटकांचा प्रभावीपणे वापर करणे महत्वाचे आहे. मसुदालेखन करताना ग्राहकाला डोळ्यासमोर ठेवणे गरजेचे असते. त्यामूळे मसुदा लेखनही व्यवस्थित होते. एकूणच जाहिरातीची मांडणी आकर्षक करून उत्पादीत वस्तूचा आवश्यक संदेश ग्राहकांपर्यत कसा पोहचेल याची दक्षता घेणे महत्त्वाचे आहे तरच जाहिरात प्रभावी होईल. वृत्तपत्रातील जाहिरात शीर्षक, उपशीर्षक, मुख्य मसुदा, चित्रांचा वापर, घोषवाक्य, बोधचिन्हांचा वापर करून लिहिणे आवश्यक आहे तरच एक

प्रभावी जाहिरात तयार होईल. वर्तमान पत्रातील जाहिराती तयार करताना भाषा, शीर्षक आणि मुद्रणातील अनेक घटकांचा विचारकरून आकर्षक जाहिरात करणे अवश्यक असते. तरच या प्रसारमाध्यमातील जाहिरातीला यश येते.

**5) आकाशवाणी वरील जाहिराती :** आकाशवाणी हे समाजातील प्राचीन आणि श्राव्य प्रसार माध्यम आहे यामध्ये श्रोता वर्ग केवळ कानांनीच जाहिरातीचा आस्वाद घेऊ शकतो. अशा प्रकारच्या जाहिरातीसाठी निवेदन अत्यंत महत्वाचे असते. या प्रसार माध्यमाद्वारे निवेदन करणा-या व्यक्तीच्या भावान अत्यंत आकर्षक असणे गरजेचे आहे. त्याचबरोबरच त्याने भाषेचा वापर प्रभावी करायला हवे निवेदन जर संवादरूप असेल तर जाहिरात अधिक प्रभावी होते. निवेदकाच्या आवाजाचे चढउतार, लांबलचक वाक्यरचना टाळणे, उच्चारण प्रभावी करणे, आवश्यक तेथे संगीताचा वापर करणे गरजेचे आहे असे केल्यास आकाशवाणीवरील जाहिरात ही प्रभावी होते व ती वाचकाला आपल्याकडे आकर्षित करते या प्रसारमाध्यमातील जाहिरात ही एककाळी फर महत्त्वाची होती. आजही या प्रसार माध्यमातील जाहिरातीने मोठे क्षेत्र व्यापलेले दिसून येत आहे

**6) दुरदर्शनवरील जाहिराती:** दुरदर्शन हे एक अत्यंत प्रभावी असे दृक-श्राव्य माध्यम आहे. या प्रसारमाध्यमाद्वारे जाहिरात करतांना जाहिरातीचा मसुदा, दृश्य आगोदर विचारात घ्यावी लागतात. त्याबरोबरच संहितेतील पात्रयोजना, चित्रिकरण, रंगरंगती, संगीत या सर्व घटकांचा यथायोग्य वापर होणे महत्त्वाचे असते. जाहिरातीमधील निवेदन प्रभावी होण्यासाठी मसुद्यातील वाक्य लहाण आकाराची व उच्चारास सोपी असणे आवश्यक आहे. काही लोकप्रिय गाण्यांचा वापर केल्यास जाहिरात अधिक आकर्षक होते. सध्या अनेक जाहिरातीसाठी त्या त्या वस्तूसंदर्भात गाणे निर्माण केले जात आहेत त्यामूळे त्या जाहिराती अधिक आकर्षक ठरत आहेत. वर्तमानपत्र आणि आकाशवाणीवरील जाहिरातीपेक्षा फार मोठा वर्ग या माध्यमावरील जाहिरात तयार करताना दिसत आहे. म्हणून या दोन्ही माध्यमांपेक्षा अर्थिकदृष्या ही जाहिरात महाग आहे मात्र या दोन प्रसार माध्यमांपेक्षा या जाहिरातीचा प्रभाव आधिक पडतो. "दुरदर्शन हे दृक-श्राव्य माध्यम आहे त्यामुळे यावरून प्रसारित होणा-या जाहिराती आधिक परिणामारक ठरतात."[2]

**निष्कर्ष :**

1) जाहिरात हे व्यवहारचे अत्यंत महत्त्वाचे अंग आहे.
2) वेगवेगळया भाषेतून जाहिरात समाजात प्रसारित होतात.
3) जाहिरातीचे प्रमुख तीन प्रकार पडतात.
4) सध्याचे युग हे जाहिरातीचे व संगणकाचे युग म्हून ओळखले जाते.
5) मुद्रित व इलेकट्रॉनिक प्रसारमाध्यमाशिवाय वॉटसप, फेसबुक, इंटरनेट, युटयूब यासारखी कांही सामाजिक माध्यमेही जाहिरातीचा वापर करतांना दिसत आहेत. या माध्यमातील जाहिरातीचे नव्या पिढीमध्ये विशेष आकर्षण निर्माण होत आहे.
6) पूर्वी जाहिरात ही दवंडीच्यामाध्यमातून केली जात होती. आज ती बदलून वेगवेगळया सामाजिक प्रसारमाध्यमांतून केले जात आहे. अर्थात ही पध्दत जुनीच असून त्याचे स्वरूप मात्र बदललेले आहे हे येथे सूचित होते

**संदर्भ :**

1) मराठी युवक भारती-इयत्ता अकरावी-महाराष्ट्र राज्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे-2016 पृष्ठ 127.
2) उपयोजित मराठी, कल्पना जाधव, अरूणा प्रकाशन लातूर, 2010, पृष्ठ 32.



Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - II,
April - June - 2020
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | पर्यावरण व समाज : एक अभ्यास<br>**प्रा. कोटरंगे दत्ता नामदेव** | ६४-६७ |
| १५ | पर्यावरण प्रदूषण आणि मानव अधिकार<br>**प्रा. डी. आर. चव्हाण** | ६८-७२ |
| १६ | नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण व पर्यावरण प्रदूषण : एक अभ्यास<br>**डॉ. महेश मंगनाळे** | ७३-७५ |
| १७ | जलप्रदूषण - एक सामाजिक समस्या<br>**प्रा. तेलंगे नागनाथ निवृत्ती** | ७६-७७ |
| १८ | जागतिक तापमान व त्याचे दुष्परिणाम : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. पार्वती विनायक माने** | ७८-८२ |
| १९ | पर्यावरण प्रदूषणाचा ग्रामीण भागाच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर होणारा परिणाम : एक अभ्यास<br>**डॉ. प्रदीप पंडितराव लग्गड** | ८३-८७ |
| २० | प्रदूषण<br>**प्रा. डॉ. आचार्य आर. डी** | ८८-९० |
| २१ | जलप्रदूषण : एक जागतिक समस्या<br>**प्रा. आर. यु. चोचंडे** | ९१-९३ |
| २२ | जलप्रदूषण व पर्यावरण अवनती<br>**प्रा. गव्हाणे रमाकांत बबनराव** | ९४-९८ |
| २३ | पर्यावरणीय समस्यांवर आधारित साहित्याचे अध्ययन<br>**डॉ. रामहरी मधूकर सुर्यवंशी** | ९९-१०१ |
| २४ | जैवविविधतेच्या ऱ्हासाची कारणे व परिणाम<br>**प्रा. डॉ. उमाकांत ज्ञानोबा वानखेडे** | १०२-१०५ |
| २५ | मराठी साहित्यातून घडणारे पर्यावरणाचे दर्शन<br>**डॉ. विनायक तुकाराम टाळकुटे** | १०६-१११ |
| २६ | आपत्ती व्यवस्थापन आणि भारत : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. विनोद धोंडीराम आचार्य** | ११२-११५ |





Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २५. मराठी साहित्यातून घडणारे पर्यावरणाचे दर्शन

डॉ. विनायक तुकाराम टाळकुटे
मराठी विभाग प्रमुख, श्री शरदचंद्रजी पवार वरिष्ठ महाविद्यालय, नारंगवाडी ता. उमरगा जि. उस्मानाबाद.

## प्रस्तावना

'पर्यावरण' हा सजीवाच्या अतिशय जिव्हाळयाचा घटक आहे. मानव हा समाजशील प्राणी आहे समाजाच्या सानिध्यातच तो आपले जीवन व्यतीत करतो. सर्वसाधरणपणे मानव आपल्या निवाऱ्याची व्यवस्था करत असताना तो तेथील पर्यावरणाचा प्राधान्याने विचार करतो. तेथे शुध्द हवा, पाणी, वनस्पती आणि इतर सर्व सुखसोयी आहेत का हे तो अगोदर पाहतो. एंकदरीत आपल्या सभोवतालची नैसर्गिक परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. 'पर्यावरण' ही भौगोलिक संकल्पना असली तरी साहित्यातूनही सीध्द होत असते. मग ते मराठी साहित्य, हिंदी साहित्य, इंग्रजी साहित्य इत्यादी कोणत्याही प्रकारचे साहित्य असो. सर्वच साहित्यातून मानवी मनाचे दर्शन घडते. मानव हा सजीव सृष्टीतील एक महत्तवाचा आणि बुध्दिवान प्राणी आहे. जीवनातील वेगवेगळया परिस्थितीवर तो मात करीत जीवन जगतो. साहित्यिक हा समाजातूनच लहानाचा मोठा होत असल्यामुळे समाजातील सर्व घटनांचे पडसाद तो साहित्यातून अविष्कृत करीत असतो. पृथ्वीवरील विविध सौंदर्यापैकी 'निसर्गसौदंर्य' हा एक महत्तवाचा घटक आहे. पृथ्वीभोवतीच्या संपूर्ण वातावरणाला 'पर्यावरण' असे संबोधले जाते. पर्यावरण हा सजीव सृष्टीतील एक अविभाज्य घटक आहे. सर्व सजीवांचा पर्यावरणाशी अविभाज्य संबंध आहे. साहित्यातील सौंदर्य देखील पर्यावरणावरच आधारलेले आहे. अगदी प्राचीन काळापासून संतांनी देखील पर्यावरणाचे महत्तव सांगितलेले आहे. वेगवेगळया कथा, कादंबरी, कविता, चरित्र-आत्मचिरत्र या सर्व वाङमय प्रकारांतून पर्यावरणाचे पदोपदी दर्शन घडत असते. मराठी साहित्यातील निसर्गप्रेमी साहित्किांनी पर्यावरणाचे आणि निसर्गसौंदर्याचे वर्णन अगदी मनोवेधक असे केलेले आहे. पर्यावरणाशिवाय मानवी जीवन अशक्य आहे. अगदी प्राचीन काळापासून देखील मानवी जीवनाची सुरूवात ही निसर्गाच्या कुशीतूनच झालेली आहे. नद्या, नाले, ओढे, समुद्र, हरित, शेती, डोंगर –दऱ्या या सर्व घटकांचा समावेश हा पर्यावरणात होतो. मराठी साहित्यातून पर्यावरणाचे दर्शन कसे घडते हे विविध साहित्यप्रकारांत पाहता येईल.

### १. संत साहित्यातून घडणारे पर्यावरणाराचे दर्शन

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव, संत जनाबाई, संत सावता माळी, संत चोखामेळा, अशी संपूर्ण संतांची मांदियाळी ही संपूर्ण समाजाला आपल्या अभंगाद्वारे निसर्गावर प्रेम करायला शिकवते.'आनंदाचे डोही आंनद तरंग' याची अनुभूति संतानी समाजाला करून दिली आहे. जगाच्या पाठीवर वेगवेगळया संस्कृतीमुळे पर्यावरणाचे संवर्धन झालेले असले तरी हिंदू संस्कृतीमुळे पर्यावरणाचे जास्त प्रमाणात संवर्धन झालेले आहे. कारण निसर्गाला देवता मानणारी ही संस्कृती आहे. बारा महिन्यातील जवळ –जवळ प्रत्येक महिन्यात एक ना एक सण साजरा करून निसर्गाशी जवळीक



Scanned with CamScanner

साधण्याची किमया या संस्कृतीने साधलेली आहे. उदा. चैत्र गुढी पाढव्याला आरोग्यासाठी कडूनिंबाची पाने सेवन केली जातात, वैशाख अक्षय तृतीया या सणाच्या दिवशी आमरस याचे भोजन केले जाते, ज्येष्ठा गौरी वटपौर्णिमा या दिवशी वडाच्या झाडाची पूजा करून पुरणपोळीचे जेवण केले जाते, दीपावली मध्ये देवी महालक्ष्मीची पूजा केली जाते, तुळशी विवाह प्रसंगी तुळशी व आवळा या दोन वृक्षांच्या पानांची अथवा वृक्षांची पूजा केली जाते. एंकदरीत अशा सर्व सण –समारंभातून संतानी सतत निसर्गाची आठवण ठेवली, त्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. निसर्गाला ओरबाडून घेण्याची भाषा संतांनी कधीही केलेली नाही. संतांनी पर्यावरणाचे अतिशय सुंदर वर्णन केलेले आहे. सर्व सजीव सृष्टीचे आपल्यावर अनंत ऋण आहेत. त्यांचे पालन, सांभाळ केला तरच टिकाव लागेल असेच संतांनी दोहे व अभंगाद्वारे समाजाला पदोपदी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. संत शिरोमणी संत तुकाराम महाराजांनी देखील वनसंपदेचे महत्तव कथन केलेले आहे. पर्यावरणाचे महत्तव विशद करताना संत तुकाराम महाराजांनी देखील वनसंपदेचे महत्तव कथन केलेले आहे. पर्यावरणाचे महत्तव विशद करताना संत तुकाराम महाराज म्हणतात,

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ।
पक्षीही सुस्वरे आळविती ।"

अर्थात वृक्षवेली हीच सगेसोयरे आहेत असा समाजाला बोध संत तुकाराम महाराजांनी दिलेला आहे. तुकाराम महाराज हे भागवत संप्रदायाचे निसर्गप्रेमी पर्यावरण प्रेमी संत आहेत. आपल्या वाणीचे कर्तुत्व देखील त्यांनी निसर्गरूपी परमेश्वराला बहाल केलेले आहे. भंडऱ्या डोंगराच्या सान्निध्यात तर त्यांनी आपल्या जीवनाचा अधिक वेळ घालवलेला आहे.

संत सावता माळी हा माळी जातीमध्ये जन्मलेला संत आपल्या शेतातच तो परमेश्वराचे रूप शोधता, आपला भाव व्यक्त करताना तो म्हणतो,

"आमुची माळीयाची जात । शेत लावू बागाईत ॥
आम्हां हातीं मोट नाडा । पाणी जातें फुल झाडा ॥
शांती शेवंती फुलली । प्रेम जाईजुई व्याली ॥
सावताने केला मळा । विठ्ठल देखियेला डोळा ॥"[१]

संत नामदेवांच्या सृंत प्रभावळीतील या संतानी आपली स्वत:ची ओळख आणि त्यांच्या कार्याचा जो परिचय दिलेला आहे त्यातूनच त्याचे निसर्गप्रेम, पर्यावरण प्रेम सिध्द होते. आपल्या शेतातूनच त्यांनी कशी पंढरी निर्माण केली आहे हे सांगताना सावतामाळी म्हणतात,

"कांदा – मुळा भाजी ।
अवघी विठाई माझी ॥१॥
लसूण –मिरची – कोथिंबिरी
अवघा झाला माझा हरी ॥२॥

मोट - नाडा –विहीर – दोरी ।

अवघी व्यापिली पंढरी ॥३॥

सावता म्हणें केला मळा ।

विठ्ठल पायीं गोविंला गळा ॥४॥

माळी जातीमध्ये जन्मलेला हा संत असल्यामुळे सतत कष्ट करावे लागायचे. त्यांची पर्यावरणविषयक भावना या अभंगातून सिध्द होते.

**२. ग्रामीण कवितेतून घडणारे पर्यावरणाचे दर्शन**

ग्रामीण साहित्याची सुरूवातच निसर्गापासून झालेली आहे. ग्रामीण माणूस हा निसर्गाच्या सानिध्यात आपले संपूर्ण जीवन घालवताना दिसतो. म्हणून अनेक निसर्ग कवींनी पर्यावरणावर आधारित कविता लिहिलेल्या आहेत. मराठी ग्रामीण कवितेतील निसर्ग कन्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बहिणाबाई चौधरींच्या कवितेतून पर्यावरण विषयक विचार व्यक्त होताना दिसतो. 'बहिणाबाईची गाणी' या त्यांच्या कविता संग्रहातून बहिणाबाई चौधरींनी पर्यावरणाचे अगदी हुबेहुबे आणि बोलके वर्णन केलेले आहे. पहिल्या पावसाचे वर्णन करताना बहिणाबाई म्हणतात,

"आला पहायलाा पाऊस

शिपडली भुई सारी

धरत्रीचा परमय

माझं मन गेलं भरीआला पाऊस पाऊस

आता सरीवर सरी

शेतं शिवारं भिजले

नदी नाले गेले भरी"[२]

बहिणाबाईंच्या कवितेतून विविध प्रकारचे पशु, पक्षी, प्राणी, नदी, नाले, ओढे, वनस्पती या सर्व पर्यावरणीय घटकांचे वर्णन आलेले आहे. मराठी कवितांतून ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील, ना. घ. देशपांडे, ना. धों. महानोर, आनंद यादव इत्यादी कवींनी निसर्गाचे अतिशय अप्रतिम असे वर्णन केलेले आहे. ग्रामीण कवी विठ्ठल वाघ यांच्या 'काया मातीत मातीत' या कविता संग्रहातून त्यांनी शेतकरी जीवन व शेतीचे समर्पक वर्णन केलेले आहे. ते म्हणतात,

"दाणे भरती कन्सात येती हुशार पाखंर

भर हंगामात अशा होते पारखी भाकरं

ताहा पोटातली आग पेट घेते अंगभर

मंग सांगेल फणाची अनी होते धारदार

कोनं सांगावं रगत तिले लागणार किती?

खापराच्या दिव्यातून मंग भेटतील वाती (काया मातीत मातीत पृष्ठ.२८)

ना. धों. महानोर यांच्या काव्यातून शेतीतील पर्यावरणाचे चित्रण आलेले आहे. या कविंचे सारे भावनात्मक बंध हे रानाशी, शेतीशी जोडलेले आहेत. रान हे कवीचे ध्यान आहे. या ध्यानात कवीला काव्याचा साक्षात्कार होतो. नभ आणि भूई यांच्यातील संबंध जाणवायला सुरूवात होते. यांच्या कवितेतून शृंगारिक वर्णनही आलेले आहे.

"ओटी कापूस भरला जडावलं ग चालणं

तंग काचोळीच्या गाठी धोंडी मनाचं चांदणं" (रानातल्या कविता पृष्ठ. १९)

नारायण सुमंत यांच्या कवितेतून माती, आभाळ, चांदणं, धरत्री इत्यादींचे वर्णन आलेले आहे. कवी म्हणतो,

"माथी आभाळ पिकलं

पिक चांदण्याचं आलं

ही धरती पिकली

धान जोंधळयाचं आलं" (रानभैरी पृष्ठ. २०)

**३. ग्रामीण कांदबरीतून घडणारे पर्यावरणाचे दर्शन**

ग्रामीण कांदबरीतून आलेले पर्यावरणाचे चित्रण हे मानवी मनाला मोहून टाकणारे असेच आहे. ग्रामीण कादंबरीतून अनेक ग्रामीण साहित्यिकांनी पर्यावरणाचे चित्रण केलेले आहे. आनंद यादव या ग्रामीण लेखकांनी तर आपले संपूर्ण साहित्य लेखन हे ग्रामीण भाग ग्रामीण माणूस आणि ग्रामीण परिसर समोर ठेवूनच केलेले आहे. पर्यावरणवादी विचार असलेल्या या साहित्यकाच्या 'झोंबी' कादंबरीतून चित्रित झालेले पर्यावरणाचे रूप हे मोहक आहे. त्याने स्वत:चा अनुभवच या कादंबरीतून शब्दबध्द केलेला आहे. लेखक आनंद यादव पर्यावरणाचे वर्णन करताना म्हणतात,

"मळयात मी रामफळं, सिताफळं, भोकरं, जांभूळ, कोवळे नारळ, गाभुळलेल्या चिंचा रग्गड खाल्ल्या. रायवळ आंब्याच्या कितीतरी जाती चाखल्या. नारळा एवढ्या नारळी आंब्यापासून सगळयांत छोट्या साखर गोटीपर्यत सगळे आंबे चाखले. रायवळ आंब्यात नाना चवी, नाना प्रकारचे वास, केसराच्या कोयापासून ते टक्कल पडलेल्या कोयापर्यंत सगळया कोया चाखल्या"[३]

आनंद यादव यांनी पर्यावरणाचे केलेले वर्णन अगदीच मोहक वाटणारे आहे. काही ग्रामीण कादंबऱ्या या देवदासींच्या जीवनावर आधारलेल्या आहेत. त्यातून डोंगरातील देवीला एखाद्या मुलीला देवदासी म्हणून सोडले जाते. या अशा वर्णनातूनही पर्यावरणाचे चित्रण आलेले आहे. ग्रामीण कादंबरीकर राजन गवस यांच्या 'चौंडकं' या कादंबरीतून याचे वर्णन आलेले आहे. 'चौंडकं कादंबरीची नायिका सुलीला तिच्या घरच्यांनी देवदासी म्हणून सोडतना स्त्रिया गीत गातात,

"आईच्या दरबारी

लेक जल्माची बांधली

परशु देवाच्या शपथीनं

बया डोंगराची जहाली.''[४]

मानवी हद्याला छेद देणाऱ्या या प्रसंगातून देखील पर्यावरणाचे वर्णन आलेले आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या कांदबरीतील निसर्ग पाहता माडगुळकरांची कांदबरी माणदेशातील असल्यामुळे हा प्रदेश ओसाड, माळरान आणि सततचा दुष्काळ असणारा असा आहे. त्यांच्या कांदबऱ्यांचे विषय पाहता निसर्गचित्रिण त्यांच्या कादंबरीतून प्राधान्याने आलेले आहे. त्यांच्या कांदबरीतील निसर्गाचे हे रूप वाचनीय करणे हे देखील एक आव्हानच आहे. बनगरवाडीतील निसर्ग हा रूढ अर्थाने सुंदर नाही परंतू माडगूळरांच्या लेखणीतून कुतूहल निर्माण करणारे आणि सुक्ष्मपणाने आलेले त्याचे रूप लक्षवेधक आहे. या निसर्गाचा परिणाम बनगरवाडीतील प्रत्येक व्यक्तीवर झालेला असल्याचे दिसून येतो. येथील निसर्गाचा उल्लेख माडगूळकरांनी जो केलेला आहे त्यातील किडे – मुंग्याप्रमाणे ही माणसे सर्वसामान्य अशी आहेत. बाळू बनगरही गावाला तालीम उभारण्यासाठी आपल्या मळयातील झाड देत नाही. कारण सांगताना तो म्हणतो, ''एवढं एक झाड हाय सावलीला माझ्या रानात. माझी गुरं –ढोरं, मुलं –माणसं सावलीला बसत्यात घटकाभर, ते तुमी नेता, मी देनार न्हाई''(बनगरवाडी पृष्ठ ८२

एकंदरीत पाऊस, हवामान, डोंगर –दऱ्या, समुद्र, नद्या, जंगल, वनस्पतीसृष्टी पाणी तेथील प्राणीसृष्टी अशा लहान –मोठ्या घटकांचा निसर्गाच्या स्वरूपात समावेश करावा लागतो. मानवी जीवनावरही या निसर्गाचा मोठा परिणाम होतो. एका अर्थाने मानवी जीवन सर्वच दृष्टीने निसर्गाशी बांधले गेलेले आहे. ग्रामीण कांदबरीतून अनेक मराठी ग्रामीण साहित्यिकांनी आपल्या निवदेन शैलीतून पर्यावरणीय सौंदर्याची भर घातलेली आहे. विश्वास पाटील, मोहन पाटील, व. बा. बोधे, व्यंकटेश माडगूळकर, शेषेराव मोहिते, सौ मथू सावंत, गणेश आवटे इत्यादी कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांतून निसर्गसौंदर्य चित्रित केलेले आहे.

**समारोप**

'पर्यावरण' हा मराठी साहित्यातील देखील एक महत्तवाचा घटक आहे. विविध प्रकारच्या साहित्यकृतींतून पर्यावरणाचे मनोरंजक व मनमोहक वर्णन आलेले आहे. पर्यावरणाशिवाय किंवा निसर्गसौंदर्याशिवाय मराठी साहित्यातील ग्रामीण साहित्याला शोभा नाही असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. कारण नदी, नाले, ओढे, हिरवे रान हे संपूर्ण पर्यावरणीय घटक ग्रामीण कथा, कविता आणि कादंबरीतून ठिक ठिकाणी दिसून येतात. अगदी प्राचीन काळापासून ते आजपर्यंतच्या मराठी साहित्यात पर्यावरणाला अनन्यसाधारण महत्तव प्राप्त झालेले आहे. एकविसावे शतक हे पर्यावरण संवर्धन शतक म्हणून नावारूपाला येणारे आहे. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी अगदी शासन स्तरावरून देखील वेगवेगळे उपाय अंमलात आणले जात आहेत. ५जून हा पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने समाजात पर्यावरण संवर्धनाचे महत्तव बिंबवले जात आहे. मराठी साहित्यातील वेगवेगळया वाङमयप्रकारांतून निसर्गाचे अर्थात पर्यावरणाचे दर्शन होते. प्रसंगानुसार कथा, कविता, कादंबरी, इत्यादी विविध वाङमयप्रकारांतून कधी ओसाड, उजाड पर्यावरणाचे दर्शन होते तर कधी हिरवळ असणारा प्रसन्न निसर्ग दिसतो. लेखकांनी पर्यावरणाचे हे घडवलेले दर्शन अतिशय सौंदर्यपूर्ण असेच आहे. कोणत्याही साहित्यकृतींचा



Scanned with CamScanner

'वातावरणनिर्मिती' हा घटक अतिशय महत्तवाचा आहे. साहित्यातील प्रसंग वर्णन, पात्रचित्रण, व्यक्तिचित्रण अशा विविध घटक प्रसंगातून साहित्यिक पर्यावरणाकडे आपोआपच झुकतो. म्हणून कोणत्याही साहित्यकृती पर्यावरण चित्रनाशिवाय पूर्ण होत नाहीत.

**संदर्भसूची**

१. प्र. न. जोशी, प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १२०
२. बहिणाबाईची गाणी – बहिणाबाई चौधरी
३. झोंबी, आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पाचवी १९९४ पृष्ठ २०८
४. चौडकं, राजन –गवस, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती चौथी २०११ पृष्ठ १८५.
५. विठ्ठल वाघ – काया मातीत मातीत
६. ना. धों. महानोर – रानातल्या कविता




Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA






Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II / Hindi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan



Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण<br>**डॉ. वसंत पु. राऊत** | ६६-६८ |
| १४ | भारतीय समाजातील लिंगभेद विषमता एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>**राजश्री विष्णू पांचाळ** | ६९-७२ |
| १५ | स्पेशल रिपोर्ट : एक दृष्टिक्षेप<br>**प्रा. योगीनाथ झा. नगराळे** | ७३-७६ |
| १६ | चंदपूर व गडचिरोली जिल्ह्यातील उत्सवांचे सामाजिक महत्व<br>**कु. प्रियंका अशोकराव आवते (जाधव)** | ७७-८० |
| १७ | १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंरीतील स्त्री प्रतिमा<br>**प्रा. विनायक तुकाराम टाळकुटे** | ८१-८४ |
| १८ | योगा आणि मानसिक आरोग्य<br>**प्रा. डॉ. विश्वनाथ भोजाजी रासवे** | ८५-८७ |
| १९ | बालमजुरी आणि मानवाधिकार<br>**प्रा. सुधीर वि. बानुबाकोडे** | ८८-९१ |
| २० | कॉ. शरद पाटील यांची स्त्रीवादी लेखक म्हणून भूमिका व कार्य<br>**प्राचार्य डॉ. शारदा गोविंदराव वंडे**<br>**प्रा. अनिल प्रभाकर निकम** | ९२-९६ |
| २१ | राज्यघटना व शिक्षणाचा अधिकार<br>**प्रा. डॉ. दिलीप जानकीराम घोंगडे** | ९७-१०३ |
| २२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही संबंधी विचार<br>**डॉ. अशोक विठ्ठलराव वाहुरवाघ** | १०४-१०८ |
| २३ | अन्न भेसळीचे मानवी जिवनावर होणारे परिणाम<br>**प्रा. डॉ. शामली जा. दिघडे** | १०९-११५ |
| २४ | नक्षलवाद : आदिवासी अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम<br>**प्रा. निलेश दे. हलामी** | ११६-११८ |
| २५ | भारतीय संविधान व मुलभूत हक्क<br>**नितिन गणपती खांडेकर** | ११९-१२२ |





Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १७. १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंरीतील स्त्री प्रतिमा

प्रा. विनायक तुकाराम टाळकुटे
श्री शरदचंद्रजी पवार वरिष्ठ महाविद्यालय, नारंगवाडी ता. उमरगा जि. उस्मानाबाद.

मराठी साहित्यामध्ये १९६० नंतर वेगवेगळे वाड्मय प्रवाह उदयास आले. त्यात प्रामुख्याने दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रिवादी साहित्य, जनवादी साहित्य आणि आदीवासी साहित्याचा समावेश होतो. त्यातील ग्रामीण साहित्य प्रवाह हा एका वेगळया मार्गाने वाटचाल करणारा आहे. भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे शेतीवर उपजिवीका भागवणारे शेतकरी आणि शेतमजुर यांची संख्या जास्त आहे त्यामुळे हा वाड्मय प्रकार देखील इतर वाड्मय प्रकारापेक्षा मोठा म्हटले तरी कांही चुकीचे ठरणार नाही असे मला वाटते. या साहित्य प्रकारातील जीवन हे वास्तव जीवन आहे. जे जगले अनुभवले भेगले तेच ग्रामीण साहित्यकांनी ग्रामीण साहित्यातुन शब्दबध्द केलेले आहे. मग ते कविता, तथा किंवा कादंबरी असेल. या सर्वांची पार्श्वभुमी ही एकच असणार.

ग्रामीण साहित्यातील स्त्री ही खेडयातील आहे. रुढी, परंपरा, धार्म, कर्म नित्यनियमाने पाळणारी अंधश्रध्दाळु, दैववादी, पुरुष सत्ताक कुटुंब पध्दतीत पतीच्या अधिपत्याखाली राहणारी, विधवा, परित्यक्ता, शेषीत, बलत्कारी, अशी ही स्त्री आहे आणि हे सर्व पाळण्यातच तीला मोठेपणा वाटतो, समाधान वाटते अशा या स्त्रिच्या प्रतिमा १९८० नंतरच्या मराठी साहित्यातुन कशा आलेल्या आहेत हे आपणास पाहता येईल.

**रुढी परंपरा आणि पुरुषी अहंकारास बळी पडलेल्या स्त्रिया**

कृषि प्रधान भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला कुटुंबात दुय्यम स्थान आहे. अर्थात ती स्वतंत्र नाही. 'न स्त्री स्वतंत्र्यमर्हती' या मनुवचनाप्रमाणे ती स्वतंत्र नाही. तिला सुरवातीपासुन ते शेवटपर्यंत पिता, पुत्र, पती या एकाच्या ना एकाच्या नियंत्रणाखली आपले जीवन व्यथित करावे लागते. तीला स्वतंत्र रहाता येत नाही आणि राहीली तर ते समाजमान्य देखील नाही आणि तीच्या देखील बुध्दिला हे स्वातंत्र्य मान्य नाही कारण ही स्त्री रुढी व परंपराच्या नात्यात अडकलेली आहे.

व्यंकटेश माडगुळकरांच्या 'करुणाष्ठक' कांदबरीतून चित्रित केलेली आई ही रुढी व परंपरा पाळणारी अंधश्रध्दाळु स्त्री आहे. आपल्या वाटयाला आलेले जीवन ते निमुठपणे सहन करते कारण आपण स्त्री आहोत, आपण आबला आहोत, आणि असेच स्त्रीला वागावे लागते. असा तिचा समज आहे. स्वत:ची मुलगी कमी वयात विधवा झाली असताना देखील ती त्या मुलीच्या दुसऱ्या लग्नाचा विचार न करता म्हणते ''बाई या जगात जन्माला येऊन स्त्रीच्या जातीला वेगवेगळया भुमिका पार पाडाव्या लागतात. बायको म्हणुन, बहिण म्हणुन, सुन म्हणुन त्यातली आईची भुमिका नाही आपल्या वाटयाला आली म्हणायच आणि मन दुसरीकडे गुंतवायच'' ०१

'झोंबी' या आनंद यादवांच्या कादंबरीतील तारा मुलासाठी कितीही मुलींना जन्म देते. वस्न कुत्र्यासारखी हेटाळणी, नवऱ्याचा मारा, संसाराचा व्याप हे सर्व करुन देखील नवरा धाक दाखवतो. "तुझ्या भन! जर का आता पोरगीच झाली तर तुला तिथल्या तिथेच सोडचिठ्ठी देतो का नाही बग. माझं घर बुडवायच्या इरादान तु ह्या घरात घुसलीस रांड" ०२

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीयांच्या भावनेची कधीही कदर केलेली नाही. 'गणगोत' कादंबरीतील नायीका अंजू लग्न झाल्यापासुन त्रास सहन करते तर जिनगानीमधील राधाबाई आई–वडीलांच्या इज्जतीसाठी कमी वयात विधवा झाली असताना देखील दुसरा घरोबा न करता ती पुर्ण जवानी जाळते. गयाला समज देताना ती म्हणते. "अगं बाई सण–वार, रिती–जिवाज समदे बाया माणसालाच पाळावं लागतात. गडीमाणसांना कोणी नांव बोट ठिवत नाही. बाईलाच बोल लावतात." ०३

बा.ग. केसकरांच्या 'कुणाच्या खांदयावर' या कादंबरीतील सुरवंता ही पुरुषी अहंकारात बळी पडलेली स्त्री आहे. आठराविश्वे दारिद्रातुन देखील ती अपला पती मल्हारीवर निस्सिम प्रेम करते. मुकदम तिच्यावर अतिप्रसंग करण्याच्या प्रयत्न करतो पण ती स्वतःला समजते की, "आपण काष्टयाला घट्ट असल्यावर त्याची काय माय व्यालीया" ०४

असं म्हणण–या स्त्रीवर मुकादम बळजबरी .बलात्कार करुन तिला भ्रष्ट करतो म्हणजेच ती मुकादमाच्या पुरुषी अहंकारास बळी ठरते. 'हाल्या हाल्या दुधू दे' कादंबरीतील आनसा ही न्यानबाची बायको भोळया नवऱ्यासोबात देखील संसार करते. तीची मुलगी सोबा लग्न होऊन सासरी नांदायला जाते तेव्हापासुन तिचा छळ होतो. तिचा सासराच तिच्यावर वाईट नजर ठेवतो नको नको ते आरोप करुन तीला माहेरी आणुन सोडले जाते. ती कामाला गेली असताना देखील समाज तिचा वेगळाच अर्थ काढतो तेंव्हा ती आत्महत्या करते.

'असं जगणं तोलाचं' मधील 'धुरपा' ही रंगाने काळी असल्यामुळे नामू तिचा नवरा तीला लवकर स्विकारीत नाही तिची फार्कत मागतो परंतू धुरपा ही आपल्या गुणामुळे घरात टिकुन राहते. काही दिवसानंतर त्या दोघाचे सुत जुळतात एवढा त्रास होवुन देखील ती म्हणते. "चला माय! एवढं नांदण तर लागलं ताला–सुराला आज जीव बिनघोरी झाला. राबायच अन् कष्टाचं कुणाला पडलय? का कष्टलं लई मंजी माणुस झिजुन जातयं? आता तेवढ बाईसाबाच लगीन आन् रावसाबाची मॅट्रीक झाली की झालं म्हागलचं सारं! हामी दोघ तर हायच की राबायला." ०५

यातुन तीची घराबद्दलची असणारी ओढ दिसुन येते. 'बस्तान' कादंबरीतील नामु मास्तरची बायको शांतावैनी हि रुढी परंपरा पाळणारी स्त्री आहे. नामु मास्तरचा अक्कातंगीच्या देवस्थानावर विश्वास नाही. परंतु शांतावैनी पुत्रप्राप्तीसाठी अक्कातंगीला नवस करीत असल्याचे दिसते. रंगनाथ पठारेच्या 'रथ' कादंबरीची नायिका सरुबाई ही पतीच्या धाकाखाली वावरताना दिसते. नवरा हा दारुडा आहे. तो माहेरी तीला नेण्यासाठी आला तेंव्हा तो सायकलवर बसुन तर बायकोला मागे चालत न्यायचा. एकंदरीत रुढी, परंपरा व पुरुषी अहंकारास बळी पडलेल्या स्त्रीया कादंबरीत ठिकठिकाणी पाहवयास मिळतात.



Scanned with CamScanner

**विधवा, परित्यक्ता, बलात्कारीत व व्याभीचारी स्त्री**

१९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील काही स्त्रीया या विधवा परित्यक्तया व बलात्कारीत देखील दिसतात. विश्वास पाटलांच्या 'झाडाझाडती' कादंबरीतील खैरमोडे मास्तरांची 'शेवंती' ही लाडकी गुणी मुलगी, पण गावातील गावगुंड मुलं विच्यावर बलात्कार करतात. ती विवाहीत आहे. मुला बाळांची आई आहे. काकुळती येवुन ती म्हणते, "पाया पडती व दादा, सोडा मला. मी लेकराची माय हाय" ०६

तरी त्या गावगुंडाना तिची दया येत नाही तीला ते मनसोक्त भोगतात पण ती विवाहीत आहे नांदणे तुटेल या भितीपोटी ती सर्व प्रकार पचवते. 'कावड' कादंबरीतील गोरख मास्तराची आई ही कलाला सोबतच्या अनैतिक संबंधातुन गर्भवती राहते. आणि गर्भपात करण्याच्या प्रयत्नातुन औषध न पचल्यामुळे फुकटची प्राणाला मुकते तर ' बिजली' या व.बा.बोधेंच्या कादंबरातील 'बिजली' ही व्यभिचारी स्त्री नवरा असताना मैतर ठेवते व सासऱ्यासोबत बायको वागल्या सारखीच वागते. सासऱ्या सोबतच्या पहिल्याच भेटीत ती म्हयणते "दादासाहेब माझ्या वयावर जावु नका. आतापर्यंत आर्धा डझन पुरुष मी अनुभवले. अगदी शाळेतल्या मास्तरापासुन सारे एकजात स्वार्थी. झाडावरच्या पाखरा सारखे मौसम पाहुन येणारे फळ चघळुन पळणारे माझं शरीरच पाहिजे ना अरे घ्याना. मनसोक्त भोगुन घ्या पण निदान पाच मिनिटाच्या सुखानंतर दिलासा देणार काळजातलं प्रेम तरी मला दया." ०७

या विधाना वरुन बिजलीला शरीर विक्रय कारण्याच काही वाटत नाही असं दिसतं. एकीकडे बलात्कार झाल्यामुळे मनस्ताप झालेली शेवंता दिसते तर दुसरीकडे या गोष्टीला महत्व न देणारी बिजली दिसते. 'कुणाच्या खांदयावर' मधील सुरवंता एकदा का मुकादमाकडुन शिलभ्रष्ट झाली की नंतर ती पर पुरुषाच्या शरीर सुखाला चाटावलेली दिसते आणि यातुन तिचा सुखी संसार मोडकळीस येतो.

'बस्तान' कादंबरीतील वेश्या 'सावी' ही पैशासाठी चंदयासोबत शरीराचा सौदा करते "पन्नास रुपय दिलाय. आणि सारी कापडं काढ म्हणतोय भाडया. शंभराची नोट टाक. सारी कापडं उतरतो फुकट हाय व्हय" ०८ असं म्हणून त्याला विरोध करते.

पैशासाठी शरीर विकणाऱ्या स्त्रिया देखील या कालखंडातील ग्रामीण कादंबरीतुन आढळतात. राजन गवस यांच्या 'चौडकं' या कादंबरीतुन देवदासी व जोगतीन स्त्रीयांचे चित्रण आलेले आढळते. या स्त्रीया रुढी परंपरागत पध्दतीने देवाला सोडलेल्या आहेत. देवाची दासी म्हणजे तिने कुणाशीही विवाह करु नये तर संभोग मात्र करावा हेच समाजाला अपेक्षित असते. पण घरोबा करु नये हेही अपेक्षित असते. या कादंबरीची नायीका 'सुली' ही बबन्याशी वयात आल्या नंतर लगट होते त्यापासुन तिला गर्भ राहतो. ती त्या बाळाला जन्म देवु ईच्छिते बबन्याने देखील तीला गावात घर बांधुन देण्याचे कबुल केलेले असतो तेंव्हा दुसरी देवदासी तिला विरोध करते व म्हणते. "खुळी हाईस लेकी आसं नसतंय. आपण देवाच्या रांडा. आपल्या बरबर संसार कोण करील." म्हणजेच आपण संसार करणेहे अपेक्षित नसते. हेच तिला सुचित करावयाचे होते.



Scanned with CamScanner

सारांश, १९८० नंतरच्या मराठी साहीत्यामध्ये अशा वेगवेगळया वृत्ती, प्रवृत्तीच्या स्त्रीया असलेल्या आपणास पहावयास मिळतात. काही मोजक्याच कादंबरीतील स्त्रीयांच्या प्रतिमा दाखविण्याचा प्रयत्न सदरील शोधनिबंधातुन मी केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. करुणाष्टक, व्यकंटेश माडगुळकर, आवृत्ती आठवी २०१३, पृष्ठ १०७
२. झोंबी, आनंद यादव, आवृत्ती पाचवी १९९४ पृष्ठ १४
३. जिनगानी, मधु सावंत, प्रथमावृत्ती २००० पृष्ठ ७
४. कुणाच्या खांदयावर, बा.ग. केसकर, प्रथमावृत्ती १९८४ पृष्ठ १६
५. असं जगणं तोलाचं, शेषेराव मोहिते प्रथमावृत्ती १९९४ पृष्ठ १४०
६. झाडाझडती, विश्वास पाटील आवृत्ती बावीसावी २०१६ पृष्ठ ३८९
७. बिजली, व.बा. बोधे, प्रथमावृत्ती १९८३ पृष्ठ ४२
८. बस्तान, मोहन पाटील, प्रथमावृत्ती १९९७ पृष्ठ ६१



Scanned with CamScanner

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary International E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

02nd February 2019 Special Issue – 113

# Environmental Awareness & Socio-economic development in Rural Area: Issues, Problems and Remedies

**Chief Editor**
**Dr. Dhanraj T. Dhangar**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
**Dr. H.N. Rede**
Principal
B.S.S. Arts, Science & Commerce College,
Makni, Tq. Lohara, Dist. Osmanabad (M.S)

**Co-Editor**
**Prof. K.A. Lomte**
**Dept. of English**
B.S.S. Arts, Science & Commerce College,
Makni, Tq. Lohara, Dist. Osmanabad (M.S)

Scanned with OKEN Scanner

79. पर्यावरण जनजागृती समस्या चुनौतियां एवं समाधान 229

प्रा. डॉ. एम.ए. येल्लूरे

80. पर्यावरण जनजागृती आणि कृषी विकास 232

प्रा.डॉ. नागेंद्र किशन कांबळे

81. पर्यावरण संरक्षण प्रबंधन में महिलाओं का योगदान 235

प्रा. लेफ्टनंट ज्ञानेश्वर सोनेराव चिट्टमपल्ले

82. महाराष्ट्रातील पाणलोट क्षेत्रविकास - एक दृष्टीक्षेप 238

प्रा.डॉ.महेश महादेव पवार, प्रा. उध्दव शिवाजी गंभीरे

83. भारतातील नद्यांच्या पाणीवाटपासाठीचा संघर्ष 241

डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर



Scanned with OKEN Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | Special Issue -113 | February 2019 | UGC Approved No. 40705
Environmental Awareness & Socio-economic development in Rural Area :Issues, Problems & Remedies

# पर्यावरण जनजागृती आणि कृषी विकास

**प्रा.डॉ. नागेंद्र किशन कांबळे**
लोकप्रशासन विभाग, एस.एस.पी सिनिअर कॉलेज नारंगवाडी

**प्रस्तावना :–**

आधुनिक काळामध्ये पर्यावरणाचे महत्त्व फारच वाढले आहे. विशेषतः 21 व्या शतकातील पृथ्वीवाशियाना प्रतिकूल हवामानाशी तोंड द्यावे लागत आहे. परिणामी पर्यावरणातील तापमानामध्ये वाढ होत आहे. त्याचे कारण शोधले असता वातावरणात अतिजास्त कार्बनडाय ऑक्साईटचे प्रमाण हे द्यावे लागेल. पृथ्वीतलावरील प्रगती आणि त्यातून निर्माण झालेली मोठमोठी औद्योगिक प्रकल्प, नागरीकरण, वाहनाची गर्दी, खनिज संपत्ती आणि कोळसा इंधनाच्या ज्वलामुळे पर्यावरणात वेळोवेळी संयुगे मिसळत असतात. तसेच मानवानी आपल्या गरजापोटी विविध उपक्रमातून पर्यावरणाला बाधा निर्माण करण्याचे कार्य करित आहे. त्यामध्ये रेफ्रिजरेटर, एअरकंडीशन, सुगंधी द्रव्ये आणि डाय यामुळे पर्यावरण मोठया प्रमाणात प्रदुषीत होवून पृथ्वीच्या संतुलनात बाधा निर्माण झाली आहे. आजच्यास्थितीत प्रमाणित $CO_2$ पेक्षा 16% जास्त झाला असून गेल्या 70 वर्षात 30 हजार रसायने, 6 लाख टन ॲटीमनी, 8 लाख टन निकेल, 10 लाख टन कोबाल्ट आणि अनेक अनैसर्गीक पदार्थ पर्यावरणात मिसळली आहेत. त्यामुळे कार्बनडाय ऑक्साईडचे वातावरणात जणू चादर पसरली आहे. या सर्व परिणामुळे पर्यावरणाचे तापमान सरासरी तापमानापेक्षा $1^0$ ते $2^0$ वाढले आणि यामुळे सरासरी पर्जन्यमान, वाऱ्याची गती व दिशा ढगांचे प्रमाण आणि पावसाचे अनिश्चितपणा यामध्ये बदल घडून येत आहे.[1]

वरिल सर्व प्रदुषणाला पर्यावरण जनजागृतीच्या माध्यमातून आटोक्यात आनले जाऊ शकते. आणि त्याचे चांगले परिणाम कृषी विकासासाठी होण्यास मदत होईल. आज कृषी क्षेत्राकडे पाहिले असता शेतकऱ्याची दैनंदिन जीवन फार मोठया प्रमाणात ठासळली असून त्यातून आत्महत्याचे प्रमाण ही वाढले आहे. यामागचे कारण शोधले असता अनिश्चित पाऊस होय. आणि अनिश्चित पावसाचे कारण शोधले असता पर्यावरणाचा ऱ्हास हे होय. तेंव्हा पर्यावरण जनजागृती आणि कृषी विकास या विषयाची निवड प्रस्तून शोध पेपरसाठी करण्यात आली आहे.

**उद्देश :–**

1. पर्यावरणाचा अर्थ समजून घेणे.
2. पर्यावरण जनजागृतीचे महत्व जाणून घेणे.
3. पर्यावरण जनजागृतीच्या समस्या समजून घेणे.
4. कृषी विकासात पर्यावरणाचे महत्व समजून घेणे.

**माहिती संकलनाची पध्दत :–**

प्रस्तूत विषयाला अनूसरुन या ठिकाणी माहिती संकलनाच्या दोन्ही प्रकाराचा उपयोग करण्यात आला आहे. प्राथमिक आणि द्वितीयक स्त्रोताद्वारे तथ्य अथवा माहिती गोळा केली आहे. प्राथमिक साधनामध्ये प्रामुख्याने निरिक्षण, प्रश्नावली, मुलाखत, आणि अनुसूची इत्यादी साधनाचा उपयोग करून माहिती संकलीत करण्यात आली आहे. तर द्वितीय साधनामध्ये प्रा मुख्याने व्यक्तिगत प्रलेख, सार्वजनिक प्रलेख, प्रकाशीत, अप्रकाशीत विविध अहवाल, गॅजेटिसर, पुस्तके, वर्तमानपत्रे आणि मासिके इत्यादी साधनाचा उपयोग करून माहिती गोळा करण्यात आली आहे.

**पर्यावरणाचा अर्थ :–**

पर्यावरणाचा अर्थ शास्त्रीयदृष्टया बहुव्यापक व बराच गुंतागुंतीची आहे. मुळात पर्यावरण या शब्दाची निर्मीती फ्रेंच भाषेतील Environ या मुळ शब्दापासून इंग्रजीत Environment असा शब्द प्रचलित झाला यालाच मराठीत पर्यावरण असे म्हटले जाते. थोडक्यात पर्यावरण म्हणजे सभोवतालची परिस्थिती ही एक किंवा अनेक सजीवांच्या संदर्भात असू शकते. तसेच ती एक किंवा अनेक घटकांनी मिळून बनलेली असते. काही घटक निसर्ग निर्मीत, काही मानवनिर्मीत असतात. तर काही घटक निर्जीव व काही घटक सजीव असतात. या सर्व प्रकारच्या घटकाची परस्पर क्रिया सातत्याने सुरु असते. यातूनच एकत्रित स्थिती अथवा पर्यावरण निर्मीती होते. पर्यावरणाचा अर्थ समजून घेण्यासाठी या संदर्भातील काही व्याख्या समजून घेणे महत्वाचे ठरते.

**1.जॉन टर्क :–** यांच्या मते, "पृथ्वीवरिल पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर असणारा प्रभाव आणि पर्यावरणाच्या संदर्भात मानवाला ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्या सर्व समस्यांचा अभ्यास करून त्यांच्या निर्मूलनासाठी शोध घेणे म्हणजे पर्यावरण होय."

**2.बर्नाड नेबेल :–** यांच्या मते,"पर्यावरण म्हणजे विविध परिसंस्था प्रणालीचे परस्पर संबंधातील संतुलनमुलक तत्वाचे अध्ययन होय."[2]

वरिल पर्यावरणाच्या व्याख्येवरून पर्यावरणाचा अर्थ समजून येण्यास मदत होते.

**पर्यावरणाचे प्रकार :–**

साधारणातःपर्यावरणाचे एक नैसर्गिक पर्यावरण आणि दुसरे सांस्कृतीक पर्यावरण असे दोन प्रकार पडतात. नैसर्गिक पर्यावरणामध्ये प्रामुख्याने मृदावरण, जलावरण,वातावरण, प्राकृतिकरचना, हवामान प्रवाहप्रणाली, जमीन, भुगर्भरचना प्राणी, वनस्पती, सुक्ष्मजीव इत्यादी घटकांचा समावेश होतो. तर सांस्कृतिक/मानवनिर्मीत पर्यावरणामध्ये



Scanned with OKEN Scanner

प्रामुख्याने लोकसंख्या, वसाहती, आर्थीक, सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक इत्यादी घटकांचा समावेश होतो.[3]

**पर्यावरण जनजागृती :–**

